# मोशेनी लिखेल पुस्तक
# मोशेने लिहीलेले पुस्तक
## वळख

लेवीना पुस्तक कायद कानूनतीन बनेल शे, परमेश्वरनी मोशेले लायीसनं इस्राएल लोकेसेल देयल व्हतं. हाई कायदा कानून बलीदान कसे करानं अनी दर्शनमंडपनाजोडे आराधणा कसे करानं यानाबारामां देयल शे “लेवी” हाई शब्दना आर्थ “लेवीसना बारामा” जो इस्राएलना कुय व्हता ज्यासले परमेश्वरनी याजक म्हनीसनं (पाळक) अनी मंदीरनी देखभाल कराकरतान निवाडेल व्हत. परंपरातीन दखाले गयूत तर ज्या विद्वान व्हतात त्यासले आशे वाटसं की लेवीन पुस्तक अनी दुसरा पुस्तकबी (उत्पती, निर्गम, गणना अनी अनूवाद) भविष्यवक्ता मोशे यानी हाई लिखेश शे, त्यामां आशे प्रचुती व्हसं की पुस्तक सोता आशे संकेत देस, कारन लिखेल शे की परमेश्वरनी हया गोष्टी मोशेले सांगेल व्हत्यात. काही विद्वानसले आशे बी वाटसं की या पुस्तक जुना कायमां एकजागे व्हयीसनं मनजे 5 वी, 6 वी इ.स.पु बाबेलमां तयार व्हयनी. 1:1

लेवीयना पुस्तकमां सुस्वातले आशे वाचामा येस की परमेश्वरनी याजकसले येगयेगळा परकारनां चढावाना आदेश देयल शे. यासमासला काही बलीदान लोकेसना पापसकरता चढायेल व्हतात. काही बलीदान सोतानी ईच्छातीन, बाकीनासनी परमेश्वर प्रेम व्हत म्हनीसनं मानता करात, कोनतबी बलीदान राहो शुध्द अनी बिन दोषना राहावाले पाहीजे, मनजे माणुसकडतीन एकदव उत्तम राहावाले पाहीजे, हाई परीस्थीती परमेश्वरनी पवित्रता दखाडसं. हाई पुस्तकनी शेवटना भागमां आशे समजाडामां येयल शे की इस्राएल अनी याजक हयासनी कशे शुध्द राहावाले पाहीजे, तशेच अशुध्दतामाईन शुध्द कशे व्हवाले पाहीजे हाई सांगेश शे. हाई पुस्तकना परमुख ईषय हाई शे की परमेश्वर पवित्र शे, अनी हाई पुस्कमां देयल बठा नियम पाळीसनं परमेश्वरनीसंगे राहावानं.

रूपरेषा

येगयेगळा बलीदान चढावाना आदेश देयल शेतस. *1:1–7:38*

अहरोन अनी त्याना पोऱ्या यासले याजक बनाडानी बारामां सांगेल शेतस. *8:1–10:20*

शुध्द अनी अशुध्द मनजे येगयेगळा आजार यानाबारामां नियम सांगेल शेतस. *11:1–15:33*

अन्न, सण, माणुसनी वागनूक अनी शब्बाथ यानीबारामां येगयेगळा नियम सांगेल शेतस. *16:1–27:34*

## होमबली

1 परमेश्वरनी दर्शनमंडप माईन मोशेले आवाज दिसन बोलना.
2 इस्राएल लोकेसले अस सांगानं, जर तुम्हना माईन एखादा माणुस पशुबळिना
अर्पण करी तवय त्यानी बकर्‍यामेंढया यामातील अर्पण करानं.
3 गुरंढोरसमातील होमबळी अर्पण करानं व्हई त्यासनी पाक नर अर्पण करानं;
तो त्यासनी दर्शनमंडपना दारमा अर्पण करानं, तवय परमेश्वर देखत मान्य व्हई.
4 होमबळीना पशुना डोकावर हात ठेवाना तवय तो पशु पश्चातापकरता मान्य
व्हई.
5 त्यानी त्या वासुस्ले देवना देखत मारानं अनं अहरोनना पोर्‍या ज्या सेवक
शेतस त्यासनी त्यानं रंगत अर्पण करीसन दर्शनमंडपना दारपान जी वेदी शे त्यावर
आजुबाजूले शितडानं.
6 तवय होमबळी पशुना कातडा काढीसन त्यासना तुकडा कराना.
7 नंतर अहरोन सेवकना पोर्‍यासनी वेदीवर इस्तव ठेवानं अनी त्यानावर लाकड
ठेवानं;
8 अनं अहरोनना पोर्‍या ज्या सेवक शेतस त्यासनी वेदीवरना इस्तववरना
लाकडासवर पशुना त्या तुकडा, डोका अनं चरबि हाई रचाना.
9 त्यानी आतडि आनं पाय त्यानी पाणीघाई धोवानं तवय सेवकसनी सर्वासना
वेदीवर होम करीसन ते अर्पण करानं तवय ते परमेश्वरनि करता सुवासिक अर्पण
व्हई.
10 शेरडामेंढारा माईन होमबळी अर्पण करानं व्हईते तो नर पाक र्‍हावाले पाहिजे.
11 त्यासनी त्याले परमेश्वरनां देखत वेदीना उत्तर बाजुले मारि टाकानं आनं
अहरोनना पोर्‍या जे सेवक शेतस त्यासनी त्याना रंगत वेदीना आजुबाजूले शितडानं.
12 त्यानी त्याना कापीसन तुकडा करानं अनी त्याना डोका अनं चरबी हाई
वेगळा करानं ह्या सर्वा तुकडा सेवकसनी वेदीना इस्तववरना लाकडसवर रची देवानं.
13 त्यानी आतडी अनं पाय त्यानी पाणीघाई धवानं. मंग सेवकसनी बठासना
वेदीवर होम करीसन त्यानं अर्पण करानं. हाई होमबळी परमेश्वरना करता सुवासिक
अर्पण शे.

14 परमेश्वरनि करता त्याले पक्षीसनी होमबळी अर्पण कराना व्हईते होलासना
आनं पारवसना पिल हयासना अर्पण करना पडि.
15 सेवकसनी तो पक्षी वेदीजोडे आनीसन त्याना डोका मोडीसन येगळं करी
टाकानं अनी वेदीवर त्याना होम करानं अनी त्यानं रंगत वेदीना बाजुले गाळी
टाकानं.
16 त्याना गळानी पिशवी अनं पिस काडीसन वेदीना पुर्व भागले राख टाकाना
जागावर फेकी टाकानं.
17 त्यानी तो पंखना मझारमाईन फाडी टाकानं. पण ते भाग वेगळा कराना नही.
तवय सेवकसनी वेदीना ईस्तवना लाकडासवर त्याना होम करानं. हाई होमबळी
परमेश्वरना करता सुवासिक अर्पण शे.

# 2

### अन्नार्पण

1 ज्या कोणी परमेश्वरले अन्नार्पण करानं व्हई तर त्यानी मैदाना अर्पण करानं.
त्यानावर तेल टाकीसन लोबान ठेवानं.
2 त्यानी ते अहरोना पोर्‍या ज्या सेवक शेतस त्यानाकडे आनानं. त्यामाईन मुठ
भरीसन मैदा, तेल अनं सर्वा लोबान संगे आणीसन सेवकसनी स्मारकभाग म्हणीसन
त्याना वेदीवर भेट करानं.
3 अर्पण माईन जे काही उरी ते अहरोना अनं त्याना पोर्‍यासना व्हई; हाई उरेल
भेट परमेश्वरले नवस करानं जी भेट हवन त्यामासला परम पवित्र शे.
4 भट्‌टीमा भाजेल अर्पण करानं व्हईते ते तेलमा मळेल मयदान्या बेखमीर भाकरी
नाहीते तेलमा चोपडेल बेखमीर चानक्या राहावाले पाहीजे.
5 तवामां भाजेल भेट करानं व्हई ते तेलघाई मळीसनी बेखमीर मयदानं ऱ्हावाले
पाहीजे.
6 त्याना दाखला दाखली तुकडा करीसनी त्यानावर तेल टाकानं, हयाले
अन्नार्पण म्हणतस.
7 कढाईमा तळेल अर्पण करानं व्हई ते बी तेलघाई मळीसनी बेखमीर मैदानं
ऱ्हावाले पाहीजे.
8 हाई पध्दतमां अर्पण लयी येवानं; ते परमेश्वरना देखत आणानं, सेवकसकडे
आणानं. त्यानानंतर सेवक ते वेदीनाजोडे लई जाई.
9 सेकवकसनी अर्पण माईन स्मारकभाग काडीसनी त्याना वेदीवर होम करानं.
तवय ते परमेश्वरना करता सुवासिक भेट व्हई.

10 अर्पण माईन जे काही उरी ते अहरोनना अनं त्याना पोऱ्यासना व्हई, हाई
उरेल परमेश्वरले नवस करानं जे भेट त्यामासला परम पवित्र शे.
11 परमेश्वरले अर्पण करेल कोणते भी अर्पणमाईन खमीर ऱ्हावाले नही पाहीजे,
खमीर नाहिते मध हयाना अग्नीमा हवन करीसनी ते परमेश्वरले अर्पण करानं नही.
12 पहिला फळ म्हणीसनी त्याना अर्पण परमेश्वरले करानं; पण ते सुवासिक
हवन म्हणीसनी वेदीवर अर्पण करानं नही.
13 तू बनाडशी त्या सर्वा अर्पण मिठघाई चवदार बनाडानं; तू आपले देवनीसंगे
करेल करारनं मिठ आपले अर्पणमा घालाले चुकानं नही. तुना सर्वा अर्पण मिठना
ऱ्हावाले पाहीजे.
14 परमेश्वरनी करता तु अर्पण म्हणीसनी पहिला पिक अर्पण करशी तवय
ईस्तववर भाजेल हीरवा कनससना दाना; म्हणजे हिरव्या कनससले चोळीसनी
काढेल उंब्या पहिला पिक अर्पण म्हणीसनी लय;
15 त्यानावर तेल टाक अनं लोबान ठेव; हयाले म्हणतस अन्नार्पण.
16 चोळीनी काढेल दाना अनं तेल यानामाईन जरासा अनं सर्वा लोबान
स्मारकभाग म्हणीसनी सेवकसनी जाळनं; हाई परमेश्वरनी करता हवन शे.

# 3

## शांत्यर्पण

1 ज्यासले शांती अर्पणना यज्ञ करानं व्हई अनं ते बी पाळेल प्राणीनं करानं व्हई
तर ते यज्ञपशु नर राहो का मादी राहो ते परीपुर्ण दखीसनी परमेश्वर करता अर्पानं.
2 त्यानी त्यासना पशुना डोकावर हात ठेवानं अनं ते दर्शनमंडपना दारपान मारानं.
अनं अहरोना पोऱ्या ज्या याजक शेतस त्यासनी त्याना रंगत वेदीना आजुबाजूले
शितडानं.
3 शांती अर्पणना यज्ञपशूना ज्या भागना परमेश्वरकरता होम करानं ते आशे;
आतडासवर पसरेल चरबी अनं त्याले लागेल बठी चरबी.
4 दोन्ही गुर्दासनावरना कमरना जोडे जी चरबी अनं गुर्दासपावोत काळजना वरना
पडदा हाई सर्वा न्यारा करानं.
5 हाई बठा लयसनी अहरोना पोऱ्यासनी वेदीवर, इस्तवर रचेल लाकडासवरना
होमबळीवर त्याना होम करानं; हाई परमेश्वरनीकरता सुवासिक अर्पण शे.
6 परमेश्वरनी करता शांती अर्पणना यज्ञकरता पाळेल प्राणी व्हईते, ते नर राहो
की मादी राहो, त्यानी ते परीपुर्ण दखीसन आनानं.

7 जर त्याले मेंढाना बळी अर्पण करानं व्हई ते त्यानी परमेश्वरना देखत अर्पण
करानं.
8 त्यानी त्या पशुना डोकावर त्याना हात ठेवानं अनं ते दर्शनमंडपनाजोडे मारानं
अनं अहरोना पोऱ्यासनी त्याना रंगत वेदीना चारीबाजुले शितडानं.
9 शांती अर्पणना यज्ञपशुना जे भागना परमेश्वर करता होम करानं शे ते आश
शे त्यानी चरबी अनं पाठना कणामाईन कापीसन काढेल चरबी लागेल शेपटी,
आतडासवर पसरेल चरबी अनं त्याले लागेल चरबी.
10 दोन्ही गुर्दा, त्यानावरना कंबरना जोडेना अनं गुर्दयासपावोत काळजना वरना
पडदा अलग करी टाकानं.
11 याना सेवकसनी वेदीवर जाळानं; हाई परमेश्वर करता अर्पण शे.
12 बकरीनी बळी व्हईते त्यानी ते परमेश्वरना देखत अर्पानं.
13 त्यानी त्याना डोकावर त्याना हात ठेवानं अनं दर्शनमंडपना समोर ते मारानं.
अनी अहरोना पोऱ्यासनी त्यान रंगत वेदीवर चारीबाजुले शितडानं.
14 हाई बळीना जे भाग परमेश्वरले भेट म्हणीसनी अर्पानं ते आशे शे;
आतडासवर पसरेल चरबी, त्याले लागेल बठी चरबी,
15 दोन्ही गुर्दा, त्यानावरना कंबरना जोडेनी चरबी अनं गुर्दासपावोत काळजना
वरना पडदा अलग करी टाकानं.
16 त्याना सेवकसनी वेदीवर जाळानं; हाई सुवासिक अर्पण शे; चरबी म्हणीसन
जेवढं व्हई ते परमेश्वरनं शे.
17 तुम्हीन चरबी अनं रंगत खावानं नई; हाऊ तुमले अनं तुमना घराणासले
कायमना नियम शे.

# 4

### पापर्पण

1 तवय परमेश्वर मोशेले बोलना,
2 इस्राएल लोकेसले अस सांग; ज्या कामसले देवनी नही सांगेल शे तरी बी
एखादानी चुकीसनी पाप करी टाकं तवय ते पाप कोणाकडतीन घडनं,
3 लोकेसले पाप लागी आशे पाप अभिषिक्त सेवकनी करेल व्हई तर त्यानी
त्याना पापनीकरता पापर्पण म्हणीसनी एखादा तरूण बैल परमेश्वरले अर्पानं.
4 तो बैल देवना देखत दर्शनमंडपना दारपान त्यानी आनानं अनं त्याना डोकावर
हात ठेईसनी देवनी देखत ते अर्पानं.
5 अभिषिक्त सेवकसनी बैलनं थोडं रंगत आनीसनी दर्शनमंडपमा लई जावानं.

6 अनी सेवक त्यासना बोट रंगतमा बुडाईसनी देवनी देखत पवित्र भागमा
अंतरपटना समोर ते सात दाव शितडानं
7 याजकसनी त्यामाईन काही रंगत लईसनी दर्शनमंडपमा देवनीमोरे धुपवेदीना
शिंगासले लावानं; अनं बैलना बाकीना सर्व रंगत दर्शनमंडपना दारपान वती टाकानं.
8 त्यानंतर पापबळीना वासरूना बठी चरबी काढी टाकानं म्हणजे आतड्यासवर
पसरेल चरबी अनं त्याले लागेल बठी चरबी,
9 दोन्ही गुर्दा, त्यानावरना कमरना जोडे जी चरबी अनं गुर्दासपावोत काळजना
वरना पडदा हाई सर्वा न्यारा करानं.
10 जस हाई सर्व होमबळीना वासरूपाईन न्यारा करतस तसे हाई न्यारा करी
टाकानं अनं ते सेवकसनी ते होमवेदीवर अर्पानं.
11 बैलनं कातडं, मास, डोक, पाय, आतडी, शेण,
12 हाई बठा बैल छावणीना बाहेर जठे राख टाकतस आशे शुध्द ठिकानले लयी
जावानं अनं लाकडासवर ठेईसनी आगघाई जाळी टाकानं, जठे राख टाकतस तठे
ते जाळानं.
13 इस्राएलनी बठी मंडळीनी चुकीसन एखादं पाप करं अनं ते मंडळीले समजनं
नई, जे काम देवनी नई सांगेल व्हतं, ते काम करं तर त्या दोषी ठरतीन,
14 मंग त्यासनी करेल पाप उजेडमा उना, तवय मंडळीनी बैलनं पापबळी अर्पण
करानं अनी तो दर्शनमंडपना समोर आणानं.
15 मंडळी माईन पुढारीसनी परमेश्वरना देखत त्या बैलना डोकावर हात ठेवानं
अनी त्याले परमेश्वरना देखत मारानं.
16 अभिषिक्त सेवकसनी ते बैलनं जरासं रंगत लीसनी दर्शनमंडपमा आनानं.
17 सेवकनी त्या रंगतमा त्याना बोट बुडावानं परमेश्वरना देखत, आंतरपटना
समोर सात दाव शितडानं.
18 मंग दर्शन मंडपमा परमेश्वरना समोर जी वेदी शे तिना शिंगसले काही रंगत
लावानं; अनी बाकीनं सर्व रंगत लईसनी दर्शनमंडपना दारपान जी वेदी शे तिना
पायथापान वती देवानं.
19 त्या बैलनी बठी चरबी काढीसनी वेदीवर तिना होम करानं.
20 पापार्पणना बैलना जसं करतस, तशच याना भी करानं; ह्या प्रकारे सेवकसनी
इस्राएल लोकसना करता प्रायश्चित करानं, मनजे त्यासले क्षमा व्हई.
21 पहिला बैल बाहेर लई जाईसनी जाळं तशं हाऊ भी बैल छावणीना बाहेर
लईसनी जाळानं; हाई मंडळीना करता पापार्पण शे.

22 ज्या कामसले देवनी नई सांगेल शे अशं एखादं काम करी टाकं तो दोषी धराई
जाई.
23 अनी त्यानी करेल पाप त्याले समजनं; त्यानी परिपुर्ण आशे बोकडा बळी
देवानं करता आणानं.
24 त्यानी त्या बोकड्याना डोकावर हात ठेवानं. अनी परमेश्वरना समोर जठे
यज्ञपशु मारतस तठे ते मारानं; हाई पापार्पण शे.
25 त्याना नंतर सेवकसनी त्याना बोटघाई ते पापार्पणनं काही रंगत लिसन होम
वेदीना शिंगसले लावानं अनं बाकीनं सर्व रंगत होम वेदीना पायथावर वती टाकानं.
26 शांत्यर्पणना यज्ञपशूना चरबीनागत यानी भी बठी चरबी वेदीवर होम करी
टाकानं; ह्या प्रकारे त्याना पापना करता सेवकसनी प्रायश्चित करानं मनजे त्यानी
क्षमा व्हयी.
27 सामान्य लोकासमाईन एखादानं चुकीसनी पाप करेल व्हई मनजे ज्या कामे
परमेश्वरनी नही सांगेल शे ते त्यासनी करी टाकेल व्हई तो दोषी ठरी.
28 अनं त्यानी करेल पाप त्याले समजनं व्हई तर त्यानी ते पापना करता एखादी
परिपुर्ण बकरी लई येवानं.
29 अनं त्या पापार्पणना डोकावर हात ठेवानं अनी जठे होमबळी करतस त्या
जागावर ते मारानं.
30 त्या नंतर सेवकसनी त्याना बोटघाई ते पापार्पणना काही रंगत आणीसन होम
वेदीना शिंगसले लावानं अनं बाकीना सर्व रंगत वेदीना पायथावर वती टाकानं.
31 अनी शांत्यर्पणना यज्ञपशुना चरबीना मायक याना भी बठी चरबी अलग करी
टाकानं अनं याजकसनी ती परमेश्वरना करता सुखदायी हवन व्हई; त्या करता तिना
वेदीनावर होम करानं; सेवकसनी त्याना करता प्रायश्चित करानं मनजे त्यानी क्षमा
व्हई.
32 जर त्यानी अर्पणना करता पापर्पण मेंढा आणेल व्हई ते निर्दोष राहावाले
पाहिजे अनी ती मादी पाहिजे.
33 त्यानी पापबळीना डोकावर हात ठेवानं अनं जठे होमबळी मारतस त्या
ठिकाणले ते मारानं.
34 त्या नंतर सेवकसनी त्याना बोटघाई ते पापबळीना काही रंगत आणीसन
होमवेदीना शिंगसले लावानं अनं बाकीना रंगत वेदीना पायथावर वती टाकानं.
35 अनी शांत्यर्पणना कोकराना चरबीना मायक बठी चरबी अलग करी टाकानं
अनी परमेश्वरना करता वेदीनावर हव्यवर तिना होम करानं; हाई पध्दतमा त्यानी
करेल पापना करता सेवकसनी त्याना करता प्रायश्चित करानं मनजे त्यानी क्षमा
व्हई.

# 5

## पापबली

1 तु काही दखेल शे का, नाहिते काही ऐकेल शे आशे एखादानं साक्षीदार हाई
नातातीन शपथ दिसन ईचारं व्हई अनं त्यानी सांगाले नही बोली दिधं, हाई दोष
त्याना कडतीन घडेल शे तर त्याले शिक्षा भेटी.
2 जर एखादानं चुकीसनी अशुध्द् वस्तुले हात लाई दिद तर तो दोषी ठरी, मंग
ते अशुध्द् वनपशुना राहो का मरेल ग्रामपशुना राहो नाहिते रांगणारं अशुध्द् मरेल
जनावरसनं शव राहो.
3 हाई प्रमाण एखाद माणुसनी एखादी अशुध्द् वस्तुले चुकीसनी हात लाय व्हई
अनं हाई त्याले समजनं मनजे तो दोषी ठरी, मंग ती अशुध्द् होणारी वस्तु कशाभी
परकारनी राहो.
4 कोणी माणुसनी बरावाईट कराबद्दल अविचारमा शपथ लिदी व्हई, मंग
अविचारमा लेयल कशाभी गोष्ट राहो अनं ती त्यान चुकीसनी करेल व्हई, अनं
ती त्याले समजनं व्हई तर त्याले बठया गोष्टीनाबद्दल त्याले दोषी समजानं.
5 तो अशा कशाभी गोष्टीमा दोषी व्हईना अनं त्यानी पाप कर व्हई तर त्यानी
पाप कबुल करानं.
6 त्यानी करेल पाप बद्दल परमेश्वरकरता दोष अर्पन आणानं; त्यानी गवारामाईन
एक मादी मनजे मेंढी नाहिते बकरी पाप अर्पनाकरता आणानं. सेवकसनी त्याना
पापना करता प्रायश्चित करानं.
7 त्याले मेंढा देवानी ऐपत नही व्हईते त्यानी दोन होले नाहिते पारवासना दोन
पिला दोष अर्पनाकरता परमेश्वरपान लई येवानं. त्यानामाईन एक पापर्पण अनं
दुसरा होमर्पण करानं.
8 त्यानी ती सेवकसकडे लई येवानं; त्यानंतर सेवकसनी पापबळी पहिला देवानं
अनं त्यानी मुंडक मोडानं पण त्याले न्यारा करानं नही.
9 पापबळीना बाकीना रंगत वेदीनाजोडे शितडानं अनं बाकीना रंगत वेदीना
पायथापान वतानं; हाई पापर्पण शे.
10 दुसरा चिडाना त्यानी विधिपुर्वक होम करानं. त्यानी करेल पापविषयी
त्यानाकरता याजकसनी प्रायश्चित करानं; मनजे त्यानी क्षमा होई जाई.
11 दोन होले नाहिते पारवासना दोन पिला हयाभी देवानी ऐपत नही व्हईते त्यानी
त्याना पापनीबद्दल एक दशमांश मयदा पापार्पण म्हणीसनी आणानं अनं त्यानी त्यामा
तेल टाकानं नही अनं धुप टाकानं नही कारण हाई पापार्पण शे.

12 त्यानी सेवकसकडे आणानं अनं सेवकसनी त्यामाईन मुठभर लईसनी
स्मारकभाग म्हणीसनी वेदीवर परमेश्वरकरता करेल हवनावर त्याना होम करानं,
हाई पापर्पण शे.
13 शेवट कशाभी गोष्टीसनाबारामा कोणी पाप करी तवय याजकसनी
त्यानाकरता प्रायश्चित करानं मनजे त्यानी क्षमा व्हई जाई

### दोषार्पण

14 तवय परमेश्वर मोशेले बोलना.
15 जर कोणी परमेश्वरनी पवित्र वस्तुनीबारामा अविश्वास देखाडी अनं
चुकीसनी पाप कर व्हई त्यानी परमेश्वरले दोष अर्पण करानीकरता गवारामाईन
एखादा परिपुर्ण मेंढा लई येवानं; तु ठरावसी तेवढा चांदीना शकेल एवढा राहावाले
पाहिजे, हाई शकेल पवित्रस्थानंना पैसा परमानी राहावाले पाहिजे; हाई दोष अर्पण
शे.
16 जी पवित्र वस्तुनीबारामा त्यानी पाप कर व्हई तिना भरपाई करी दयावना;
अनं ती वस्तुनी किंमतमा अजुन पाचवा भाग टाकीसनी सेवकसले देवानं; अनं
सेवकसनी हाई दोष अर्पणना मेंढा अर्पण करीसनी त्याकरता प्रायश्चित करानं मनजे
त्यानी क्षमा व्हई जाई.
17 परमेश्वरनी नही सांगेल शे आशे पाप एखादाकडतीन व्हईल होई, मंग ते
चुकीसनी का होयना त्याले दोषी समजानं; अनं त्याले पापना भार उचलं पडी.
18 त्यानी मेंढासना गवारासमाईन एक परिपुर्ण मेंढा दोष अर्पणकरता सेवकसपान
आणानं; तु ठरावसी तेवढी किंमतमा तो राहावाले पाहिजे; त्यानी चुकीसनी पाप करं
व्हई त्याकरता सेवकसनं पाप झाकनं पडी, मनजे त्याले क्षमा व्हई
19 हाई दोष अर्पण शे, परमेश्वरनी देखत तो माणुस नि:संशय दोषी शे.

# 6

1 परमेश्वर मोशेले बोलना.
2 जर एखादानी पाप करीसनी परमेश्वरना अपराधी व्हयना, मनजे ठेव, गहाण
नाहिते लुट हयानीबारामा त्याना शेजारनी संगे करेल व्हई नाहिते त्यानावर जुलूम
करेल व्हई.
3 नाहिते एखादानी दवडेल वस्तु सापडेल व्हई अनं त्यानी त्याबारामा खोटी
शपथ लीसनी लबाड बोलीसनी अशा गोष्टी करीसनी लोक पापमा पडतस,

4 मनजे आशे पाप करीसनी दोषी व्हईना, त्याने लुट करीसनी, नाहिते जुलूम
करीसनी काही लिद व्हई ते, नाहिते एखादानं देन बुडायल व्हई ते, नाहिते एखादानं
दवडेल वस्तु त्याले सापडेल व्हई अनं ती देयल नहि व्हई ते.
5 नाहिते एखादी वस्तुनाबारामा खोटी शपथ लिदी व्हई ते, ती बठी भरी दयावानं.
जा दिवस त्याले दोषी लावामा येई, त्यारोजच ज्याना अपहार करेल व्हई त्याले बठी
भरपाई करी दयावानं अनी त्याल पाचवा भाग देवानं
6 त्यानी परमवेश्वरकरता दोष अर्पण लई येवानं, तु ठरावशी तेवढी किंमतना
गवारामाईन एक परिपुर्ण मेंढा दोष अर्पणीकरता सेवकसकडे लई येवानं.
7 सेवकसनी तो घेईसनी परमेश्वर देखत त्यानाकरता प्रयाश्चित करानं, जे काही
देवानं विरोधमा काम करेल व्हई, त्यानी त्याले क्षमा व्हई.

## होमार्पण

8 परमेश्वर मोशेला बोलना:
9 अहरोन अनी त्यान पोरे यासले सांग, होमबळी आशे करानं, होमबळी
वेदीनावर आगमा रातभर ठेईसनी ते सकाळ पावोत राहु दयावानं अनी वेदीनावरना
आग जळता ठेवानं.
10 अनी याजकसनी सणसना झगा घालीसनी त्यानंतर सणसनी चोळनी आंगवर
झाकीसनी होमबळीना आगघाई भस्म व्हावा नंतर त्यानी जी राख राही ती काढीसनी
वेदीनाबाजूले ठेवानं.
11 मंग त्यानी कपडा काढीसनी दुसरा कपडा घालानं अनं ती राख छावणीबाहेर
जठे शुध्द जागा व्हई तठे लई जावानं.
12 वेदीवरनी आग वेदीवरच जळत ठेवानं, ती ईझु देऊ नको; याजकनी त्यानावर
रोज सकाळले लाकडं लाईसन ती पेटत ठेवानं अनं त्यानावर होमबळी रचीसनी
त्यानावर शांत्यर्पणना चरबीना होम करानं.
13 वेदीनावर आग एकसारखा जळत ठेवानं, ते ईझाले नही पाहिजे

## अन्नार्पण

14 अन्न अर्पण विधि आशे शे: अहरोना पोर्‍यासनी परमेश्वरनीमोरे वेदीनाजोडे
ते अन्न अर्पानं.
15 त्या अन्न अर्पणमाईन मुठभरीनी मयदा, थोडा तेल अनं त्यावरला सर्वा
लोबान घेईसनी ते अन्न अर्पणना स्मारकभागना परमेश्वरनी करता सुवासिक हवन
व्हावाले पाहिजे म्हणीसनी त्याना वेदीवर होम करानं.

16 त्यामाईन जे उरेल राही ते अहरोना अनं त्याना पोऱ्यासनी खावानं, ते त्यासनी
पविञ जागावर दर्शनमंडपना आंगणमा बिना खमिरना खावानं.
17 जवय ते भुजतस तवय त्यामा खमीर टाकानं नही; ते मी भेटमाईन त्याना
भाग म्हणीसनी त्यासले देयेल शे; पापार्पण नाहिते दोषार्पण जशा परम पवित्र शे तशा
हाई भी शे.
18 अहरोनना संततीमाईन बठा माणसंसले ते खावानं हक्क शे; परमेश्वरनी भेट
माईन हाई त्यासना हक्कना पिढयानी पिढया कायमना चालु राहावाले पाहिजे, हाई
भेटले जो हात लाई तो पविञ व्हई जाई.
19 परमेश्वर मोशेले बोलना,
20 अहरोनले अभिषेक व्हई त्यारोज त्यानी त्याना पोऱ्यासनी संगे परमेश्वरले
जे अर्पण करानं शे ते हाई: एक दशमांस एफा मयदा रोजना अन्न अर्पण समजीने
दयावानं अनी त्यामाईन अर्धा सकासले अनी अर्धा संध्याकाळले अर्पानं
21 ते तवावर तेलमा शिजाडानं, त्यामा तेल चांगला मुरानंतर ते लई येवानं अनी
भुजेल अन्न अर्पणना वाटा पाडीसनी ते परमेश्वरनीकरता सुवासिक म्हणीसनी
अर्पानं.
22 त्याना पोऱ्यासमाईन जो त्याना जागवर अभिषिक्त व्हतीन त्यासनीभी आशेच
अर्पण करानं. कायमना विधिपरमान परमेश्वरकरता बठा होम करी टाकानं.
23 याजकसनी सर्वा अन्न अर्पणना बठा होम करी टाकानं अनं ती खावानं नही.

## पापार्पण

24 परमेश्वर मोशेले बोलना;
25 अहरोन अनी त्याना पोऱ्यासले सांग पाप अर्पणनं विधी आशे शे; ज्या
ठिकानले होमपशु मारतसं तठेच परमेश्वरनामोरे पापबलीबी मारानं; तो परम पवित्र
शे.
26 जो याजक पापबलीनं अर्पन करी त्यानी ते खावानं; दर्शनमंडपना आंगणमां
पवित्र ठिकानले तो खावानं.
27 त्याना मासना स्पर्श ज्याले व्हयी तो पवित्र; अनी त्याना रंगतना थेंब
कपडासवर उडनं तर ते थेंब उडालेल कपडा एखादं पवित्र ठिकानले जाईसन धवानं.
28 तो पापबली मडकामां शिजाडेल व्हयी ते मडकं फोडी टाकानं; पन पितळना
भांडामां तो शिजाडं व्हयी तर ते घशीसनी पानीघाई धयी टाकानं.
29 तो खावानं हक्क याजकवर्गमासला बठा माणसासले शे; तो परम पवित्र शे.
30 पन ते पापबलीनं काही रंगत दर्शनमंडपना पवित्र ठिकानले प्रायश्चितकरता
आणतीन ते त्यानं मास खावानं नही, तो आगमा जायी टाकानं.

# 7

## दोषार्पणना नियम

1 दोष अर्पणना विधी आशे शे: हाई अर्पण अती पवित्र शे.
2 ज्या ठिकाणले होमबळी मारानं शे त्या ठीकाणलेस दोष अर्पणना बळी मारानं
अनी त्याना रंगत याजकनी वेदीना चारीबाजूले शितडानं
3 त्यानी बठी चरबी त्यानी अर्पण करानं. त्यानी चरबीदार शेपटी, आतडयासवर
पसरेल चरबी.
4 दोन्ही गुर्दा, त्यानावरनी कमरनीजोडेनी चरबी अनं गुर्दापावोतना
काळजनीवरना पडदा हाई न्यारी काढी टाकानं.
5 त्याना याजकनी वेदीवर परमेश्वरना करता वेदीना आगवर होम करानं; हाई
दोष अर्पण शे.
6 हाई बळी खावानं हक याजकासमासले बठा माणसाले शे; ते पविञ ठीकाणले
खावानं: ते परम पविञ शे.
7 पापार्पण मायक दोष अर्पणनी विधी शे; दोन्ही विधी सारखाच शेतस; जो
याजक त्याना कडतीन पापले झाकीसन, त्याना त्यानावर हक्क शे.
8 जो याजक एखादा माणुसनीकरता होमबळीना अर्पण करी त्याना हक्क ते
होमबळीना कातडयासवर शे.
9 भट्टीना, कढाईमा नाहिते तवावर भाजेल बठा अन्नर्पणना यज्ञ करणारा
याजकना शेतस.
10 परतेक अन्नबळी, ते तेलमा राहो नाहिते कोयडा राहो, ते अहरोनना बठा
वाडवडीलसना शे, त्या बठासना त्यानावर सारखाच हक्क शे.

## शांत्यर्पणना नियम

11 परमेश्वरना करता ज्यासले शांत्यर्पण करानं व्हई त्यासनी विधी आशे शे.
12 त्याले ते उपकास्तुतीना करता करानं व्हई तर तेलमा तळेल बेखमीर
भाकरी, तेल लायेल बेखमीर पापड्या अनी मैदामा मळेल, तेलमा तळेल पुऱ्या
उपकारस्तुतीना अर्पणनासंगे अर्पण करानं.
13 अनी हाई उपकारस्तुतीना शांत्यर्पणना यज्ञमा खमीर टाकेल भाकरीसनभी
अर्पण करानं.
14 त्या परतेक अर्पण माईन त्यानी एक एक भाकर परमेश्वरना करता समर्पित
करेल आशे म्हणीसन अर्पण करानं. शांत्यर्पणना रंगत शितडणारा याजकना तिनावर
हक्क शे.

15 उपकारस्मरण म्हणीसनी व्हयेल शांत्यर्पणना यज्ञ बळीना मास अर्पण करानं
दिवसलेस खावानं. सकाळपावोत त्यामा काहीच उराले नही पाहिजे.
16 पण यज्ञबळीना अर्पण नवसना नाहिते स्वखुशीना व्हई तर ज्या दिनले ते तो
अर्पण करी त्या दिनले ते खावानं अनी ज्या काही त्यामा राही ते दुसरा रोज खावानं.
17 ते यज्ञबळीमाईन बाकीना मास तिसरा रोज उरेल व्हईते ते आगमा जाळी
टाकानं.
18 त्याना शांती अर्पण यज्ञबळीना मासमाईन बाकीना तिसरा रोज खावामा वनं
व्हईते ते मान्य व्हवाऊ नही. उलटं, ते अमंगळ व्हयी; अनी जो कोनी ते खादं
त्याले त्यानी अपराधनी शिक्षा भेटी.
19 ज्या मांसले एखादी अशुध्द वस्तुना स्पर्श व्हयेल वई ते खावानं नही. तर ते
आगमा जाळी टाकानं, जे शुध्द व्हई त्यानीच यज्ञबळीनं मांस खावानं;
20 पण एखादामा अशुध्दता शे अनी तो परमेश्वरकरता व्हयेल शांत्यर्पणना यज्ञ
अर्पणना मांस खाई त्याना आपला लोकेसमाईन नाश व्हवाले पाहीजे.
21 एखादा माणुसनी एखादी अशुध्द वस्तुले हात लाई दिधं व्हई, मंग ती अशुध्द
माणुसना असो किवा पशुना असो नाहिते दुसरा एखादाना अमंगळ वस्तुना राहो,
त्यानी परमेश्वरकरता करेल शांत्यर्पणना यज्ञ अर्पणनं मास खादं व्हई ते, त्याना
आपला लोकेसमाईन नाश व्हवाले पाहीजे
22 परमेश्वर मोशेले बोलना;
23 इस्राएल लोकसले अशं सांग, तुम्हीन बैलनी, मेंढरासनी नाहिते बकरीनी
चरबी खावानं नही.
24 त्यासना-त्यासना मरेल जनावरसनी नाहीते दुसरा पशुनी फाडी टाकेल
जनावरनी चरबी दुसरा काही कामले पाहिजे व्हईते ते लावानं, पण ते अजीबात
खावानं नही.
25 परमेश्वरकरता भेट म्हणीसनी जे यज्ञअर्पण आगमा होम करिसनी अर्पण
करतस त्यानी चरबी कोणी खाद तर त्याना आपला लोकेसमाईन नाश व्हवाले
पाहीजे.
26 तुम्ही ज्यानात्याना घर चिडासना, जनावरसना आशे कसानभी रंगत खावानं
नही.
27 जो कोणी रंगत खाई त्याना आपला लोकेसमाईन नाश व्हावाले पाहीजे.
28 परमेश्वर मोशेले बोलना;
29 इस्राएल लोकसले सांग, जो कोणी परमेश्वरकरता शांत्यर्पणना यज्ञबळीना
अर्पण करी त्यानी ते शांत्यर्पणना काही भाग परमेश्वरना समोर लई येवानं.

30 त्यानी त्याना हातघाई परमेश्वरकरता हवन लई येवानं, परमेश्वना समोर
ओवाळनीना अर्पण म्हणीसन ओवाळणीना करता चरबीना संगे आणानं.
31 याजकनी ती चरबीना वेदीनावर होम करानं पण बळीना ऊर अहरोना अनी
त्याना वंशजना राही.
32 तुम्हीं आपला शांत्यर्पणना यज्ञबळीना उजवा फरा समर्पित व्हयेल अंश
म्हणीसनी याजकले दयावानं.
33 अहरोनना पोर्‍यासमाईन जो कोणी शांत्यर्पणना यज्ञबळीना रंगत नाहीते चरबी
याना अर्पण करी त्याना हक्क त्या उजवा फरासवर राव्हाले पाहिजे.
34 कारण इस्त्राएल लोकेसना शांत्यर्पणमाईन ओवाळणीना ऊर अनी समर्पणना
फरा हाई मी अहरोन याजक अनी त्याना पोर्‍या यासले दी राहीनू शे. हया दोन्ही
इस्त्राएल लोकेसकडीन मिळणारा त्यासना कायमना हक्क शे.
35 याजक हाई नातातीन परमेश्वरनी सेवा कराकरता अहरोन अनी त्याना पोर्‍या
जवय त्यासले सादर करामा व्हनात त्यारोज परमेश्वरकरता लयाना हव्यासमाईन
हाई त्याना अनी त्याना पोर्‍यासना पोर्‍यासले अभिषेक भाग ठरना शे.
36 ज्यारोज परमेश्वरनी त्यासना अभिषेक करा त्यारोज त्यानी त्यासले
इस्राएल लोकासकडतीन हाई भाग मिळाले पाहिजे आशी आज्ञा करी. म्हणुन
त्यासले पिढयानपिढया हाई हक्क कायमना ठरना.
37 होमबली, अन्नबलि, पापबलि, दोषबलि याजकना समर्पणना येळले बलि
अनी शांत्यर्पणना अशं शे.
38 सीनाय जंगलमा इस्राएल लोकसनी परमेश्वरले काय काय अर्पण करानं
हयानाबद्‌द्‌ल त्यासले आज्ञा दिधी, त्या वेळले त्यानी मोशेले याना परमान सीनाय
डोंगरवर हाई विधि लाई दिधी.

# 8

## अहरोन अनी त्याना पो-या हयासना समर्पन

1 परमेश्वर मोशेले बोलना
2 तु अहरोन अनी त्यानासंगे त्याना पोर्‍या यासले अनी त्यासना कपडा,
अभिषेकना तेल पापबलिकरता बैल, दोन मेंढा अनी बेखमीर भाकरीसनी टोपली
लईसनी.
3 दर्शनमंडपना दारपान ये अनी तठे बठी मंडळीसले जमा कर.
4 परमेश्वरनी आज्ञापरमानं मोशेनी करं अनी मंडळी दर्शनमंडपना दारपान जमा
व्हयनी.

5 मोशेनी मंडळीले सांग, परमेश्वरनी जे काही करानी आज्ञा देयेल शे ती आशी;
6 मोशेनी अहरोन अनी त्याना पोर्‍या यासले आणीसनी त्यासना जलस्नान करं.
7 मंग त्यानी त्यासले कपडा घाला, त्यासना करमरले कमरबंद बांध, झगा घाल,
त्यानावर एफोद* घाला अनी नक्षीदार पट्टी एफोदनावरतीन तानीसन बांधी.
8 मंग त्यानी त्यानावर उरपट बांधा अनी त्यानामां उरीम अनी थुम्मीम ठेव.
9 मंग त्याना डोकामा फेटा घाला अनी फेटाना समोरना भागमा सोनानी पट्टी
म्हणजे पवित्र मुकूट लावं, परमेश्वरनी मोशेले आज्ञा देयेल परमानं हाई व्हयनं.
10 मंग मोशेनी अभिषेकना तेल लईसनी निवासमंडपले अनी त्यामासले बठया
वस्तुसले अभिषेक करीसनी पवित्र करं
11 त्यामाईन काही तेल लईसनी त्यानी वेदीवर सातदाव शितडानं अनी वेदी,
तिना बठा उपकरणं, गंगाळ अनी त्यानी बैठक याले अभिषेक करीसनी त्याले पवित्र
करं.
12 त्यानी अभिषेकना काही तेल लईसनी अहरोना डोकावर वतं. हाईपरमानं
अभिषेक करीसनी त्याले पवित्र करं.
13 मंग मोशेनी अहरोना पोर्‍यासले आणं, त्यासले कपडा घालात, कमरले
कमरबंद तानीसनी बांध अनी त्यासले फेटा बांध. परमेश्वरनी मोशाले आज्ञा करं
होत तशे हाई व्हईनं.
14 मंग त्यानी पापार्पणना वासरू आणं अनी अहरोन अनी त्याना पोर्‍या यासनी
अपला हात त्या पापार्पणना बैलना डोकावर ठेवं.
15 ते मारा नंतर माशेनी त्यानं रंगत लिसन त्याना बोटघाई वेदीना चारी शिंगसना
चारीबाजूले लाईसनी ती शुध्द करं अनी ते रंगत वेदीना पायनाजोडे वतं अनी
तिनाकरता प्रायश्चित करीसनी तिले पवित्र करं.
16 मोशेनी आतडयासवरना बठी चरबी, काळीजनीवरना पडदा अनी
चरबीनीसंगे दोन्ही गुर्दा हाई लईसनी त्याना होम करी टाकं.
17 बैल, त्याना कातडा, त्याना मास अनी त्यानी ईष्टा हाई बठी तळनीबाहेर
लईसनी ते आगघाई जाळी टाकं. परमेश्वरनी मोशेले आज्ञा देयलपरमानं त्यासनी
हाई करं,
18 मंग त्यानी होमबळीना मेंढा जोडे आनं तवय अहरोना अनी त्याना पोर्‍या
यासनी त्यासना हात मेंढासना डोकावर ठेवं.
19 त्याले मारा नंतर मोशेनी त्याना रंगत वेदीना चारीबाजूले शितडां

---

* **8:7 8:7** एफोद याजसना कपडा

20 मंग त्या मेंढाना तुकडा करा अनी मोशेनी त्याना डोका, त्याना मासना तुकडा
अनी चरबी हयाना होम करं.
21 आतडा अनी पाय पाणीघाई धईसनी मोशानी बठा मेंढाना होम करी टाकं, ते
परमेश्वरकरता सुवासीक होमबळी व्हयना; परमेश्वरनी मोशेले आज्ञा करी व्हती
तशे हाई व्हयनं.
22 मंग त्यानी दुसरा मेंढा मनजे समर्पणाना मेंढा जोडे आणा, अहरोन अनी त्याना
पोर्‍या यासनी त्यासना हात मेंढाना डोकावर ठेवं.
23 ते मारानंतर त्याना काही रंगत मोशेनी लईसनी अहरोनना उजवा कानना
शेंडाले, उजवा हातना अंगठाले अनी उजवा पायनी अंगठाले लावं.
24 मंग मोशेनी अहरोनना पोर्‍यासपान आनीसनी त्याना उजवा कानना शेंडाले,
उजवा हातना अंगठाले अनी उजवा पायना अंगठाले लावं. मंग मोशेनी वेदीना
चारीबाजूले शितडं.
25 त्यानी चरबी, चरबीदार शेपटी आतडयासवर राहेल बठी चरबी,
काळीजनीवरना पडदा, दोन्ही गुर्दा, त्यानवरनी चरबी अनी उजवा फरा हाई काढी
लिदी.
26 परमेश्वरनीमोरे ठेयेल बेखमीर भाकरीन्या टोपलीमाईन एक भाकर, तेल
लायेल एक पोळी अनी एक पोळी लईसनी त्या चरबीवर अनी उजवा मांडीवर
ठेवं.
27 हाई बठा त्यानी अहरोनना अनी त्याना पोर्‍यासनी हातसवर ठेवं अनी
परमेश्वरनीमोरे ओवाळणीनं अर्पण म्हणीसनी ते ओवाळानं.
28 मंग मोशेनी त्यासना हातमाईन लईसनी त्यासना वेदीनावरना होमबळीवर होम
करं; हाई समर्पणना परमेश्वरनीकरता सुवासिक भेट व्हयनं.
29 मंग मोशेनी ऊर लईसनी परमेश्वरनीमोरे ओवाळणीनं अर्पण म्हणीसनी
ओवाळी लिदं, समर्पणना मेंढाना हाई भाग मोशाना व्हता. परमेश्वरनी मोशेले आज्ञा
करी व्हती तशे हाई व्हयनं.
30 मंग मोशेनी अभिषेकना तेल अनी वेदीनावरना रंगत थोडासा लईसनी अहरोन
अनी त्याना कपडा, त्याना पोर्‍या अनी त्यासना कपडा यासवर शितडं अनी अहरोन
अनी त्याना कपडा अनी त्यान पोर्‍या अनी त्यासना कपडा पवित्र करं.
31 मोशेनी अहरोन अनी त्याना पोर्‍या यासले सांग, हाई मास दर्शनमंडपना
दारपान शिजाडानं अनी तठे समर्पणना टोपलीमाईन भाकरीनासंगे ते खा. अहरोन
अनी त्याना पोर्‍या यासनी ते खावानं आशी आज्ञा मी देयेल शे.

32 मास अनी भाकरी यामाईन जे काही उरेल व्हयी ते आगमा जाळी टाकानं.
33 तुम्हना समर्पणनी विधीना दिवस पुरा व्हतस तोपावत म्हणजे सात दिवस
दर्शनमंडपना दारनामोरे जावाले नही पाहिजे, कारण सात दिवसपावोत तुम्हना
समर्पणनी विधी व्हई.
34 तुम्हनाकरता प्रायश्चित व्हावाले पाहिजे म्हणीसनी आज करं त्यापरमान
करानी आज्ञा परमेश्वरनी देयेल शे.
35 हाई परकारे तुम्ही दर्शनमंडपना दारपान सात दिवस रात्र अनी दिवस राहीसनी
परमेश्वरनी आज्ञापरमाने वर्तन करानं. नहीते तुमीन मरशात; कारण माले आशी
आज्ञा शे.
36 परमेश्वरनी मोशेनीव्दारे ज्या गोष्टीनीबारामा आज्ञा करेल व्हता त्या सर्वा
अहरोन अनी त्याना पोऱ्या यासनी करं.

# 9

## अहरोननी करेल अर्पन

1 आठवा दिवसले मोशेनी अहरोन, त्याना पोऱ्या अनी इस्त्राएलना वडील
यासले बलावं.
2 त्यानी अहरोनले सांग, पापार्पणकरता एक परिपुर्ण वासरू अनी होमार्पणाकरता
एक परिपुर्ण मेंढा लईसनी परमेश्वरनीमोरे अर्पण कर;
3 अनी इस्राएल लोकसले आशे सांगानं, पापार्पणाकरता एक बोकड लई येवानं.
अनी होमार्पणाकरता एक वासरू अनी मेंढा लई येवानं. हाई दोनी एक वरीसना अनं
परिपुर्ण ऱ्हावाले पाहिजे.
4 अनी परमेश्वरनीमोरे शांत्यर्पणे कराकरता एक बैल, एक मेंढा अनी तेलमा
टाकीसनी अन्न अर्पण लई येवानं. कारण परमेश्वर आज तुम्हले दर्शन देणार शे.
5 मंग मोशेनी आज्ञा देयेल परमानं त्यासनी त्या बठा दर्शनमंडपना दारपान लई
व्हना अनी सर्वी मंडळी जोडे जाईसनी परमेश्वरनामोरे उभी राहीनी.
6 तवय मोशे बोलना; तुम्हले जे काही करानं म्हणीसनी परमेश्वरनी आज्ञा दिदी
ती आशी; मंग परमेश्वरनी महिमा तुम्हना दृष्टिमा पडी.
7 मोशेनी अहरोनले सांग; वेदीनाजोडे जाईसनी आपला पापबळी अनी
होमबळी यानां अर्पण कर अनी स्वताकरता अनी लोकेसकरता पाप झाकी; अनी
लोकासकडले बळीभी अर्पण करीसनी त्याकरता प्रायश्चित कर; परमेश्वरनी
आज्ञा देयल परमानं हाई कर;

8 तवय अहरोनी वेदीनाजोडे जाईसनी त्याना पापार्पणना वासरू अर्पण करं.
9 अहरोना पोर्‍या त्यानाकडे रंगत लई गयात, तवय त्यानी त्याना बोट बुडाईसनी
ते वेदीना शिंगासले लावं अनी ते वेदीना पायथाले वतं.
10 पापबळीनी चरबी, गुर्दा अनी काळीजनीवरना पडदा हयाना त्यानी वेदीवर
होम करा. परमेश्वरनी मोशेले आज्ञा करी व्हती तशे व्हयनं
11 मास अनी कातडा त्यानी छावनीनाबाहेर आणीसनी आगघाई जाळी टाकं.
12 मंग त्यानी होमबळीना पशु मारं तवय अहरोनना पोर्‍यासनी त्याना रंगत त्याले
दिद्. त्यानी ते लईसनी वेदीना आजुबाजूले शितडी दिद्.
13 मग त्यासनी ते होमबळीनं तुकडा करीसनी एक एक तुकडा अनी मस्तक
हाई त्यानापान दिद् त्यासना त्यानी वेदीवर जाळी टाकं.
14 मंग त्यानी आतडा अनी पाय धईसनी वेदीनावरना त्याना होमबळीनावर होम
करं.
15 मंग त्यानी लोकासकडले अर्पण जोडे लईसनी त्यासनाकरता आणेल
पापार्पणना बोकड मारं अनी पहिलापरमानं तेभी पापबळी म्हणीसनी अर्पण करं.
16 अनी त्यानी होमबळीलेभी जोडे लईसनी विधीपुर्वक अर्पण करं.
17 मंग त्यानी अन्न अर्पण जोडे आणं अनी त्यामासाला मुठ भरीसनी त्याना
वेदीवर होम करां.
18 बैल अनी मेंढा ज्या लोकासकरता शांत्यर्पण म्हणीसनी आणं व्हतं ते त्यानी
मारं अनी अहरोनना पोर्‍यासनी त्यासना रंगत त्यासना जोडे दिद्, ते त्यानी वेदीना
चारीमेर शितडं;
19 त्यानी बैलासनी अनी मेंढासनी वपा अनी मेंढासनी चरबीदार शेपटी
आतडयासनीवरनी चरबी गुर्दा अनी काळजना पडदा हाई त्याले दिदि.
20 अनी त्यासनी चरबी त्या बळीना उरवर ठेवानंतर त्यानी तिना वेदीवर होम
करं.
21 उर अनी उजवी मांडी हाई मोशेनी आज्ञापरमानं अहरोननी परमेश्वरनीमोरे
ओवाळणीनं अर्पण म्हणीसनी ओवाळी टाकं.
22 मंग अहरोननी लोकेसकडे वळीसनी हात वर करीसनी त्यासले आशिर्वाद
दिदा अनी जठे त्यानी पापार्पणबळी, होमार्पणबळी अनी शांत्यार्पणबळी यासना
अर्पण करं व्हतं तथाईन उतरीसनी खाल व्हनां.
23 मंग मोशे अनी अहरोन दर्शनमंडपमा गयात अनी बाहेर येईसनी लोकेसले
आशीर्वाद दिधा, तवय परमेश्वरनी महीमा बठा लोकेसले दखायनी.
24 अनी परमेश्वरकडतीन आग व्हनं अनी त्यानी वेदीनावरना होमबळी अनी

चरबी हाई जाळी टाकं; हाई दखीसनी बठा माणसेनी जयजयकार करं अनी साष्टांग
नमस्कार करं.

# 10

## नादाब अनं अबीहू ह्यासनं पाप

1 मंग अहरोनना पोर्‍या नादाब अनी अबीहू यासनी ज्यानात्याना धुपाटण लईसनी
त्यामा आग टाकं अनी त्यानावर धूप टाकीसनी ते अशुध्द अग्नी परमेश्वरनीमोरे
आणं; आशे अग्नी लई जावानाबारामा परमेश्वरनी आज्ञा कायनी व्हती.
2 तवय परमेश्वरकडतीन आग व्हनं अनी त्यानी त्यासले भस्म करी टाकं अनी
परमेश्वरनी देखत मरी गयात.
3 मंग मोशेनी अहरोनले सांग; परमेश्वरनी सांगेल शे ते हाई, ज्या मनाजोडे
येतीन त्यासनी माले पवित्र मानानं अनी सर्वा लोकासनासमोर म्हना महिमा व्हावाले
पाहिजे; तवय अहरोन शांत व्हईना.
4 मंग अहरोनना चुलतभाऊ उज्जीयेल याना पोर्‍या मिशाएल अनी एलसाफान
यासले मोशेनी बलाईसनी सांग की तुम्ही इकडे या, तुम्हना भाऊसले
पवित्रस्थाननामोरेतीन छावणीनीबाहेर लई जा.
5 मोशेनी आज्ञापरमानं त्या व्हनातं अनी त्यासना कपडासुध्दा छावणीनाबाहेर
लई गयात.
6 मोशेनी अहरोन अनी त्याना पोर्‍या एलाजार अनी इथामार यासले सांग की
तुम्ही आपला डोकासनं केस मोकळ सोडानं नही अनी आपला कपडा फाडानं
नही; जर तुम्ही तशे करं तर मरशी अनी सर्वा मंडळीवर परमेश्वरना कोप भडकी;
परमेश्वरनी जे हाई अग्नी पेटाडेल व्हतं त्यानीबारामा तरी तुम्हना भाऊबंदसनी
म्हणजे सर्वा इस्राएल घराणानी शोक करानं.
7 तुम्ही दर्शनमंडपना दारनीबाहेर जावानं नही; जाशी ते मरशी: कारण
परमेश्वरनी विहीत करेल अभिषेकना तेलघाई तुम्हना अभिषेक व्हयेल शे;
त्यासनी मोशानी सांगेलपरमानं करं.

## याजकना करता नियम

8 अजुन परमेश्वरनी अहरोनले सांग:
9 जवय-जवय तुम्ही मनजे तु अनी तुना पोर्‍या दर्शनमंडपमा जातीन तवय
तुम्हनामाईन कोणी द्राक्षरस नाहिते कोनता भी परकारनी दारु पेव्हानं नही, पिसी
ते मरशी; हाई तुम्हनाकरता पिढयानपिढया कायमना नियम शे:

10 हाई परमानं तुम्ही पवित्र अनी अपवित्र, शुध्द अनी अशुध्द यामासला भेद
वयखानं.
11 अनी परमेश्वरनी मोशानीव्दारे सांग सर्वा नियम तुम्ही इस्राएल लोकेसले
शिकाडानं.
12 मंग मोशेनी अहरोनले अनी त्याना बाकीना उरेल पोऱ्या म्हणजे एलाजार
अनी इथामार यासले सांग की परमेश्वरनी हव्यामाईन जे अन्नार्पण बाकी ऱ्हाई ते
लईसनी वेदीपान बिगर खमिरनं खाशी; कारण ते परम पवित्र शे.
13 ते तुम्ही पवित्र ठिकानं खावानं, परमेश्वरले हव्यासमाईन तो तुना अनी तुना
वंशजना हक्क शे; माले आशीच आज्ञा व्हयेल शे.
14 ओवाळेल ऊर अनी समर्पित करेल फरा हाई तुम्ही तुम्हना पोऱ्या अनी
पोरीसोबत शुध्द ठिकाणले बशीनी खावानं; कारण इस्राएल लोकेसनी करेल
शांत्यर्पणमाईन तुले अनी तुना पोऱ्यासोऱ्यासना ते हक्क म्हणीसनी देयेल शेतस.
15 समर्पण करानं फरा अनी ओवाळानं ऊर हाई चरबीना हव्यांसना सोबत
ओवाळणीनं अर्पण, त्याकरता परमेश्वरना देखत आणानं; हाई तुम्हना अनी तूम्हना
वंशना कायमना हक्क शे; आशी परमेश्वरनी आज्ञा शे.
16 मोशेनी पापबळीना बोकडले ध्यान दिसन दखं; तवय त्याले सापडनं की
ते जाळी टाकं व्हतं, हाई देखसनी अहरोनना बाकी ऱ्हायेल पोऱ्या एलाजार अनी
इथामार यासले संताप करिसनी बोलना.
17 तुम्ही पापबळी पवित्र ठिकानं काबर खादं नही? ते परमपवित्र शे अनी
मंडळीना दुष्कर्मासना भार वाहीसनी त्यासना करता परमेश्वरनामोरे प्रायश्चित
करानं याकरता ते तुम्हले देयेल शे.
18 दखा, त्याना रंगत पवित्र ठिकाणले मजारमा लयं नही, तुम्ही मना
आज्ञापरमानं त्याना मास खावालेच पाहिजे व्हतं.
19 याना उत्तर अहरोननी मोशेले दिधं की दखं, आज त्यासनी पापबळी अनी
होमबळी हाई परमेश्वरनामोरे अर्पण करं म्हणुन मनावर आशे संकट येयल शेतस;
समजा आज मी पापबळी खाई लिधं व्हतं ते परमेश्वरलं चांगलं वाटी कां?
20 जवय मोशेले हाई ऐकं मंग त्याले चांगलं वाटनं.

# 11

## शुध्द अनं अशुध्द जनावर

1 परमेश्वरनी मोशे अनी अहरोनले सांग;

2 इस्राएल लोकेसले सांगानं की, जगमासला पशुसमाईन ज्याना मास तुम्हले
खावानं शे ते हाई;
3 जनावरसमाईन ज्याना खुर चिरेल शे नाहिते दुभागेल शेतस अनी ज्या रवंथ
करंतस त्या बठा तुम्ही खावानं.
4 पण ज्या नुसता रवंथ करंतस नाहिते ज्यासना नुसता खुर चिरेल शेतस त्या
खावानं नही, उंट हाई रवंथ करस पण त्याना खुर चिरेल नही शे म्हणुन ते अशुध्द
शे.
5 शाफान रवंथ करस पण त्याना खुर चिरेल नही, म्हणुन ते तुम्हले अशुध्द शे.
6 ससा रवंथ करस पण त्याना खुर चिरेल नही, म्हणीन ते भी तुमना करतता
अशुध्द शे.
7 डुकरना खुर चिरीसनी दुभागेल शे पण ते रवंथ करस नही, म्हणीन ते भी तुमना
करतता अशुध्द शे.
8 त्यासना मास खावानं नही, त्यासना शवले हात लावानं नही, तुम्हले हाई बठा
अशुध्द शेतस.
9 पाणीमासले जे खावानं ते हाई शे; समुद्रमा अनी नदयासमा राहाणारा ज्या
प्राणीसले पख अनी खवला शेतस त्या तुम्ही खावानं.
10 पाणीमासाला ज्या प्राण्यासले पख नाहींते खवला नही आशे समुद्रमा अनी
नदयासमा राहाणारा बठा पाणीमासाला प्राणी अमंगळ शेतस.
11 तुम्ही त्यासले अमंगळ समजानं; त्यासना मास खावानं नही अनी त्यासना
शवसले अमंगळ समजानं.
12 जलाशयामासला ज्या प्राण्यासले पख नही अनी खवलाबी नही त्या बठासले
अमंगळ समजानं.
13 चिडासमाईन जे अमंगळ समजीसनी खावानं नही त्या हया शेतस; गरूड,
लोळणारा गीध, कुरर
14 घार, न्यार्‍या-न्यार्‍या जातीसना ससाणा,
15 परतेक जातना हाडयाल
16 शहामग, गवळण, कोकीळा न्यारा-न्यारा जातीसना बहिरासससाणं
17 पिंगळा, करडोक, मोठा घुबड,
18 राजहंस, पाणकोळी, गिधाड
19 करकोच, अलग अलग जातीसना बगळा, टीटवी अनी वटवाघुळ.
20 ज्या पखासवाले प्राणी पायसवर चालतस त्यासले तुम्ही अमंगळ समजानं.

21 पण चार पायसवर चालणारा पखासवाले प्राण्यासमाईन ज्यासले जमीनवर
उडया माराले पायसनावर तंगडया राहतस त्या खावानं
22 त्यासमाईन जे खावानं शेतस त्या हाई; टोळ, नाकतोडा, खरपुडे, गवत्यटोळ
हाई खावानं.
23 जमीनवर रांगणारा चार पायसना पखसना प्राणी तुम्ही अमंगळ समजानं.
24 त्यासनामुळे तुम्ही अशुध्द व्हई जातीन. जो कोणी त्यासना शवसले स्पर्श
करी त्यानी संध्याकाळपावोत अशुध्दच राव्हानं
25 त्यासना शवसना एकादा भाग कोणी उचलं तर त्यानी आपला कपडा धईसनी
संध्याकाळपावोत अशुध्दस राव्हानं.
26 ज्या पशुसना खुर चिरेल शे पण दुभागेल नहीं अनी रवंथ करतस नहीं ते
तुम्हले अशुध्द शेतस; त्यासले ज्याना स्पर्श व्हई त्यानी अशुद्धच राव्हानं
27 चार पायसावर चालणारा बठा पशुसमाईन ज्या आपला पंजासवर चालतस
त्या तुम्हले अशुध्द शेतस; त्यासना शवसले जो स्पर्श करी त्यानी संध्याकाळपावोत
अशुद्धच राहावानं
28 ज्यानी त्यासना शव उचलं त्यानी आपला कपडा धईसनी संध्याकाळपावोत
अशुध्दस राहावानं, कारण ते तुम्हले निषिध्द् शेतस;
29 जमीनवर रांगणारा जीवसमाईन तुम्हले निषिध्द त्या हया शेतस; मुंगूस, उंदिर,
वेगवेगळया जातीसना सरडा
30 चौपई, घोरपड,पाल, सांडा अनी गुहिऱ्या सरडा
31 जमीनावर रांगणारासमाईन हाई बठा तुम्हले निषिध्द शेतस; जो कोणी त्यासना
शवसले स्पर्श करी त्यानी संध्याकाळपावोत अशुध्दस राहावानं.
32 त्यासमाईन कोणी मरीसनी एखादी वस्तुवर पडी तेबी अशुध्द समजानं; मंग
ते काठना पात्र, वस्त्र, तरट, नाहिते कोनतेभी कामना हत्यार राहो ते पाणीमा टाकानं
अनी संध्याकाळपावोत अशुध्दस राहावानं; मंग त्याले स्पर्श करानं.
33 यामाईन एखादा मातीना भांडामा पडं तर त्या भांडमा जे काही राही ते अशुध्द
व्हई अनी ते भांड फोडी टाकानं;
34 जर एकादी वस्तु खावाकरता योग्य व्हई पण त्यामा पानी पडेल शे तर ती
वस्तूले अशुध्द समजानं अनी आशे भांडामा काही पेय राहिते तर तेभी अशुध्द
समजानं.
35 अनी त्यासना शवंसना एखादा भाग भट्टीनावर नाहीते चुलावर पडनं तर ते
अशुध्द समजीसनी मोडी टाकानं; कारण त्यानी ती अशुध्द व्हतस. अनी तुम्ही ती
अशुध्द समजानं.

36 झरा नाहिते विहिर ज्यामा पाणी साठा राहास ते शुध्द राहास; तरी त्यामासाला
शवले ज्याना स्पर्श व्हई ते अशुध्द समजानं.
37 त्यासना शवसना काही भाग पैरानां बियासवर पडनं तरी त्या बियासले शुध्द
समजानं.
38 त्या बियासवर पाणी शितडेल शे त्यानावर त्या प्राण्यासना शेवळासना पडनं
तर ते तुम्हले अशुध्द शेतस.
39 खावानं पशुसमाईन एखादा मरना तर त्याना शवसले शिवणाऱ्यासनी
संध्याकाळपावोत अशुध्दस राहावानं
40 त्याना शवसना काही भाग त्यानी खाद् तर त्यानी आपला कपडा धईसनी
संध्याकाळपावोत अशुध्दस राहावानं; त्याना शव उचलनारासनभी आपला कपडा
धईसनी संध्याकाळपावोत अशुध्दस राहावानं;
41 जमीनवर रांगणारा बठा प्राणी अमंगळ शेतस; ते खावानं नही.
42 जमीनवार रांगणारासमाईन ज्या पोटवर चालतस नाहिते चार पायसवर
चालतस अनी ज्यासले बराच पाय शेतस त्या काही तुम्ही खावानं नही; त्या
अमंगळ शेतस.
43 तुम्ही कोणत्याभी प्रकारना रांगत चालणारा प्राण्यासमुळे अमंगळ होवु देवानं
नही नाहिते त्यासनाव्दारा अशुध्द व्हईसनी विटाळ व्हवाले नही पाहिजे.
44 मी परमेश्वर तुम्हना देव शे म्हणुन स्वत:ले पवित्र करीसनी पविञ राहावानं;
कारण मी पविञ शे; म्हणुन जमीनवर रांगणारा कोतणतेभी जातीसना विटाळानं नही.
45 कारण मी तुमना देव व्हावाले पाहिजे म्हणीसनं त्या परमेश्वरनी तुमले मिसर
देशमाईन आठे आणं तोच मी शे; मी पवित्र शे; त्याकरता तुमीबी पवित्र व्हावानं.
46 पशु, पक्षी सर्व पाणीवर अनं जमिनवर रांगणारा बठा जनावर यासनाबारामां
47 अशुध्द अनी शुध्द, जे खावानं अनी जे खावानं नही यासमासला भेद दखानं
हाई नियम शे.

# 12

## बाळानपण व्हवा नंतर मायकरता शुध्दीरनना नियम

1 परमेश्वरनी मोशेले सांग
2 इस्राएल लोकेसले सांग: बाई गर्भवती व्हईसनी तिले पोऱ्या व्हवानंतर तिनी
सात दिवस अशुध्द ऱ्हावानं; ऋतुकाली जशी दुर बससं तशी तिले अशुध्द समजानं.
3 आठवा रोजले त्या पोऱ्यानी सुंता करी टाकानं.

4 नंतर त्या बाईनी आपला रक्तस्रावपाईन शुध्द व्हावाकरता तेहतीस दिवस पुरा
करानं; तिना शुध्दीना दिवस पुरा व्हस तोपावोत तिनी कोणतेभी पवित्र वस्तुले हात
लावानं नही अनी पवित्र ठिकानवर जावानं नही.
5 तिले पोर व्हईनीते जशी ती ऋतुकाली दुर बसस त्यापरमानं तिनी चौदा दिवस
अशुध्द ऱ्हावानं अनी रक्तस्रावपाईन शुध्द व्हवाकरता सहासष्ट दिवस पुरा करानं;
6 जवय त्यासना शुध्द व्हवानं दिवस पुर वतीन तवय तिले पोऱ्या अनी पोर वतीन
तवय होमबळी कराकरता एक वर्षीना मेंढा अनी पापबळीकरता पारवासना पिला
नाहीते होला दर्शनमंडपना दारपान याजकसकडे लई जावानं
7 मंग याजकसनी ते परमेश्वरनीमोरे अर्पिसनी तिनाकरता प्रायश्चित करानं;
म्हणजे रक्तस्रावमाईन शुध्द व्हई; जी बाईले पोऱ्या नाहिते पोर व्हई तिनीबारामा
नियम हाई.
8 तिले मेंढा अर्पण करानी ऐपत नही व्हईते तिनी दोन होला नाहिते पारवासना
दोन पिला, एक होमबळी कराकरता अनी दुसरा पापबळी कराकरता आणानं अनी
याजकसनी तिनाकरता प्रायश्चित करानं म्हणजे ती शुध्द व्हई.

# 13

## कुष्टरोग यानाईषयी नियम

1 परमेश्वरनी मोशे अनी अहरोन यासले सांग;
2 जवय माणुसनी कातडीले सुज, खवले नाहीते पांढरा डाग व्हई अनी कुष्टरोगना
चट्टा शे आशे दिसनं तवय त्यासले अहरोन याजककडे नाहिते त्याना पोऱ्या जे
याजक शेतस त्यामाईन एकजणकडे लई जावानं.
3 मंग याजकसनी आंगना चामडीनावरना चट्टा तपासानं अनी त्यामासला केस
धवळा व्हयेल वतीन अनी ते चामडीना मजारमा व्हई तवय त्याले कुष्टरोगना चट्टा
समजानं त्या माणससले याजकसकडे तपासणी करीसनी त्याले अशुध्द करी टाकानं.
4 त्याना आंगना चामडीवरना डाग धवळा व्हई पण त्याना चामडीपेक्षा ते खोल
जायेल नही व्हई अनी त्यानावरना केस धवळा व्हयेल नही व्हई तर याजकसनी
चट्टा पडेल त्या माणससले सात दिनपावत अलग ठेवानं.
5 सातवा रोज परत एकदाव याजकसनी त्यानी तपासनी करानं अनी चट्टा जशानं
तशे व्हई अनी चामडीमा पसरेल नही व्हई आशे दखामां व्हनं तर याजकसनी त्याले
आखो कोंडी ठेवानं.

6 सातवा रोज याजकसनी परत एकदावं तपासानं अनी चट्टा कमी व्हई राहिना
अनी चामडीमा ते पसरेल नही शे आशे त्याले दखायनं तर याजकसनी त्याले शुध्द
करानं; कारण ते साधा खवले शे; त्यानी त्याना कपडा धईसनी शुध्द व्हई जावानं.
7 तो शुध्द शे आशे त्याले ठरावनं म्हणीसनी याजकले दखाडानंतर चामडीना तो
डाग पसरत व्हई तर त्या माणुसनी परत एकदाव याजकले दखाडानं.
8 याजकनी तपासनी करानं अनी ते डाग चामडीमा परसरेल शे आशे दखामां
व्हना त्यानी त्याले अशुध्द ठरावानं; ते कुष्टरोग शे.
9 जर एखादा माणुसले कुष्टरोग चट्टा व्हई त्याले याजकसकडे लई जावानं.
10 याजकसनी तपासनी करानं अनी जर त्याना चामडीमा धवळी सुज व्हई अनी
त्यानामुळे त्याना केस धवळा व्हतीन अनी त्यामासला मास मुडदार व्हयेल शेतस,
11 तर त्याना चामडीमा ते जुना कुष्टरोग शे. याजकनी त्याले अशुध्द ठरावानं,
त्याले त्यानी कोंडी ठेवानं, तो अशुध्दस शे.
12 एखादाना चामडीमा कुष्टरोग फुटिसनी तो नखशिखात बठा आंगभर पसरेल
शे आशे याजकले दिसनं,
13 तर त्यानी तपासनी करानं अनी त्याले बठा आंगले कुष्टरोग व्हयेल शे त्यानी
चट्टा पडेल माणुसले शुध्द ठरावान; त्याना सर्वा आंग शुभ्र व्हयनं म्हणुन तो शुध्द
शे.
14 त्याना आंगवर काही मास मुडदार दखायनं तर त्याले अशुध्द समजानं.
15 याजकनी मुडदार मास दखीसनी त्याले अशुध्द ठरावानं; कारण आशे मास
अशुध्दस र्‌हास: तो कुष्टरोग शे.
16 ते मुडदार मास पलटीसनी धवळ व्हयनं तर त्यानी परत याजकसडे येवानं.
17 याजकनी त्याले तपासानं अनी जर त्याना चट्टा पलटीसनी धवळा व्हयेल शे
तर त्यानी त्या चट्टा पडेल माणसासले शुध्द ठरावानं; कारण तो शुध्द शे.
18 एखादानी चामडीले फोड येईसनी तो बरा व्हयना.
19 अनी फोडनी जागावर धवळी सुज व्हयनी नाहिते लालसर धवळा डाग पडनं
तर त्यानी ते याजकले दखाडानं.
20 याजकसनी तपासनी करानं अनी जर ते चामडीपेक्षा ती जागा खोल जायेल
दखामा व्हनी अनी त्यानावरना केस धवळा व्हयेल शेतस तर त्याले अशुध्द् ठरावानं;
हाई फोडमाईन बाहेर फुटेल महारोगना चट्टा शे.
21 त्यानावरना केस धवळा नही शेतस अनी ती जागा चामडीपेक्षा खोल जायेल
नही व्हयी अनी ते बुजी राहीनं शे आशे तपासतांना दखायनं तर त्यानी त्या माणुसले
सात दिवस कोंडी ठेवानं.

22 तेवढा मुदतमा ते चामडीवर पसरेल शे आशे दखायनं तर याजकसनी त्या
माणुसले अशुध्द ठरावनं अनी ते कुष्टरोगना चट्टा समजानं.
23 तो धवळा डाग जेवढानं तेवढं र्‍हाईसन ते पसरेल नही व्हई तर ते फोडनं
ओळखनं शे आशे समजीसनी याजकसनी त्याले शुध्द ठरावानं.
24 एखादाना चामडीवर जळानं ओळखन व्हई अनी ती ओळखनले मुडदार
मासमा लालसर पांढरा नाहिते नुसता पांढरा डाग येयेल व्हई.
25 अनी याजकले तपासनी व्हतांना आशे दखायनं की त्या पांढरा ठिकानवर
केस येयल शेतस अनी चामडीपेक्षा ती जागा खोल जायेल शे, त्या जागावर कुष्टरोग
फुटेल शे आशे समजानं; याजकनी त्याले अशुध्द ठरावानं, कारण ते कुष्टरोगना
चट्टा शे.
26 तरीभी याजकसले आशे दखायनं त्या धवळा जागमा धवळा केस नही शेतस
अनी चामडीमा खोल जायेल नही शेतस, बुजी जायं राहीना शेतस, तर त्यानी त्याले
सात रोज कोंडी ठेवानं.
27 सातवा रोजले त्यानी त्याले तपाशी दखानं; चामडीना तो डाग पसरेल शे
आशे दखायनं त्यानी त्याले अशुध्द ठरावानं. ते कुष्टरोगना चट्टा शे.
28 पण पांढरा डाग जेवढाना तेवढा शे, चामडीवर पसरेल नही शे अनी ते बुजी
राहिना शे तर ती जळेल ठिकानले सुज समजानं अनी याजकसनी त्याले शुध्द
ठरावानं. कारण ते नुसते जळेल जागवार ओळखन शे.
29 एखादा माणुसनी नाहिते बाईना डोकावर नाहिते दाढीवर चट्टा व्हईते,
30 अनी याजकनी त्यानी तपासनी करानं अनी ती जागा चामडीपेक्षा खोल
दखायनी अनी तिनावर काही बारीक केस व्हतीन तर त्यानी त्या माणुसले अशुध्द
ठरावानं; हाई चाई डोकानी नाहिते दाढीना कुष्टरोग शे.
31 याजकसनी हाई चाईना चट्टा तपाशी दखानं अनी ते चामडीनापेक्षा खोल
नही व्हई अनी त्यानावर काळा केस नही व्हई तर चाईना चट्टा राहेल त्या माणुसले
सात रोज कोंडी ठेवानं
32 सातवा रोजले त्यानी परत चट्टासनी तपासनी करानं; ती चाई पसरेल नही,
त्यावार काही राखाडी केस नही शेतस अनी चाईना जागा चामडीपेक्षा खोलगट
नही व्हयी आशे त्याले दखायनं.
33 तर त्या माणुसनं मुंडन करी टाकानं, पण चाईवरना केस काढानं नही;
याजकनी चाई लागेल माणुसले आजुन सात रोज कोंडी ठेवानं.
34 सातवा रोजले याजकनी ती चाई परत तपाशी दखानं अनी त्यासले आशे
दखामां व्हनं की चाई चामडीवर पसरेल नही शे अनी ती चामडीपेक्षा ती खोल नही

जायेल शे तर त्यानी त्याले शुध्द ठरावानं. त्या माणुसनी आपला कपडा धवानं अनी
शुध्द व्हयी जावानं.
35 तरिभी ते शुध्द व्हावानंतर ती चाई पसरत गईते
36 याजकाने त्याले तपासानं अनी ती चाई चामडीवर पसरेल शे आशे दखामां
व्हनं व्हयीते राखडी केस दखत बसानं नही तर त्या माणुसले अशुध्द ठरावानं.
37 ती चाई जेवढीना तेवढी शे अनी तिनावर काळा केस येल शेतस आशे जर
दखायनं तर ती चाई बरी व्हयेल शे अनी ती शुध्द शे; याजकनी त्याले शुध्द ठरावानं.
38 एखादा माणुसना नाहिते बाईना आंगवर पांढरा चकचकीत डाग व्हतीन ते,
39 याजकनी ते तपासानं अनी त्याना आंगना चामडीनं त्या दाग भुरा व्हतीनते
तर ती चामडीले फुटेल दाद समजानं; तो मनुष्य शुध्द शे.
40 एकादा माणुसना डोकाना केस गळीसनी त्याना टक्कल पडेल व्हयी तर तो
शुध्द समजानं.
41 त्याना कपाळना पुढला भागना केस गळीसनी त्याना टक्कल पडनं व्हयी
तर त्याले शुध्द समजानं.
42 त्या टक्कल पडेल डोकावरना नाहिते कपाळनावरना बाजुले काहिसा
लालसर पांढरा चट्टा पडनं तर आशे समजानं की ते टक्कल पडेल डोकावर नाहिते
कपाळवर कुष्टरोग फुटीसनी निघि राईना शे.
43 तवय याजकनी त्याले तपाशी दखानं अनी त्याना डोकानं टक्कलमा नाहिते
कपाळना वरना भागमा आंगना चामडीनावर कुष्टरोगना मायक तांबूस पांढरा चट्टा
शे आशे त्याले दखायनं.
44 तर तो माणूस कुष्टरोग शे अनी तो अशुध्द भी शे, याजकनी त्याले अशुध्द
ठरावानं; त्याना डोकाले व्हयेल तो कुष्टरोगना चट्टा शे.
45 ज्या कुष्टरोगना आंगवर हाई चट्टा व्हई त्याना कपडा फाडेल राहावाले
पाहिजे, त्याना डोकानं केस सोडेल ऱ्हावाले पाहिजे, त्यानी आपला वरला ओठ
झाकीसनी ठेवानं अनी अशुध्द आशे ओरडत ऱ्हावानं.
46 जेवढा दिवस हाई चट्टा त्याना आंगवर ऱ्हाई तेवढा दिवस त्यानी अशुध्द
ऱ्हावानं. तो अशुध्द शे, त्यानी एकला ऱ्हावानं अनी छावणीबाहेर त्यानी वस्ती
ऱ्हावाले पाहिजे.

### खराब कपडाना नियम

47 एखादा कपडाले, मंग तो कपडा लोकरना ऱ्हावो नाहिते सणसना ऱ्हावो,
कुष्टरोगना चट्टा पडनं.

48 तो सणसना नाहिते लोकरना ताण्याले नाहिते बाण्याले, चामडाले नाहिते
चामडानी बनाडेल वस्तुले पडना.
49 अनी त्या कपडाले, चामडाले, ताण्याले नाहिते बाण्याले अनी चामडाना
वस्तुमा पडेल तो चट्टा हिरवट नाहिते तांबुस व्हयना तर ते कुष्टरोगना चट्टा समजानं,
अनी याजकले दखाडानं.
50 याजकनी ते तपासानं; चट्टा पडेल वस्तुले सात रोज त्यानी अलग करी
ठेवानं.
51 त्यानी सातवा रोज तो चट्टा तपासनं अनी कपडासना ताणावर नाहिते बाणावर,
चामडासवर नाहिते चामडासनी कोनतेभी वस्तुवर तो चट्टा पसरेल शे. आशे
दखायनं तर ते चढत जाणारा कुष्ठ समजानं, ती वस्तु अशुध्द शे.
52 त्या कपडा लोकरीना ऱ्हावो की सणासना ऱ्हावो, त्यासना बाणामा, चामडामा
अनी चामडानी एखादी वस्तुले चट्टा व्हयी तर चढत जाणारा कुष्ठ ऱ्हावामुळे ती
वस्तुले आगघाई जाळी टाकानं.
53 तपासणी व्हावानंतर जर याजकले दखामां व्हनं की कपडासना ताणामा नाहिते
बाणामां नाहिते चामडाना व्हयेल एखादी वस्तुमां तो चट्टा पसरत नही.
54 तर चट्टा व्हयेल वस्तुले धई टाकानी आज्ञा याजकनी करानं अनी अजुत सात
रोज ती अलग करी ठेवानं.
55 ती वस्तु धवानंतर तिले याजकनी दखानं अनी त्या चट्टान रंग बदलेल नही
व्हयी अनी ते पसरेल नही व्हयी तरी त्याले अशुध्द समजानं; ती वस्तुले आगमा
जाळानं; तो चट्टा मजारमां ऱ्हावो नाहिते बाहेरना बाजुमां ऱ्हावो, त्याले चढत जाणारा
चट्टा समजानं.
56 धवामुळे त्या डागना चकचकीतपणा कमी व्हयेल शे आशे जर याजकले
दखायनं तर त्यानी कपडासना ताणाना नाहिते बाणासाना नाहिते चामडासना वस्तुसना
तेवढाच भाग फाडी टाकानं.
57 एवढं करिसनीबी जर कपडासना ताणामां नाहिते बाणामां नाहिते चामडानी
वस्तुमा तो चट्टा परत फुटीसनी व्हनं तर ती चट्टा फुटेल वस्तुले आगमा जाळी
टाकानं.
58 कपाडासना ताणा नाहिते बाणा नाहिते चामडानी कोनतीबी वस्तुले धवानंतर
त्याना ते डागना नायनाट व्हयनं तर ती वस्तुले परत एकदाव धवानी म्हणजे ती शुध्द
व्हयी.
59 लोकरनं नाहिते सणासना कपडासना ताणामा नाहिते बाणामा नाहिते चामडामा
एखादा वस्तुले कुष्टरोगना डाग दखामां व्हनं तर शुध्द नाहिते अशुध्द ठरावानं हाई

नियम शेतस.

# 14

## कोडना रोगघाई शुध्द करानां नियम

1 परमेश्वरनी मोशेले सांग.
2 कुष्टरोगले शुध्द ठरावानं नियम हाई शेतस; त्याले याजककडे लयी येवानं.
3 याजकसनी छावणीनाबाहेर जाईसनी त्या कुष्टरोगले तपासी दखानं अनी त्याना
आंगना कुष्टरोगना चट्टा बरा व्हयेल शेतस आशे त्याले दखामां व्हनंते
4 त्यानी आज्ञा करानी की ज्याले शुध्द करानं शे त्यानाकरता दोन जीवंत शुध्द
चिडा, गंधसरूना लाकडं, किरमिजी रंगना कपडा अनी एजोब हाई बठा लयी येवानं.
5 मंग याजकनी आज्ञा करानी की वाहाता पाणीमां माटीना भांडामा त्यामासला
एक पक्षी मारानं.
6 अनी बाकीना जीवता चिडा, गंधसरूना लाकडं, किरमिजी रंगनं कापड अनी
एजोब हाई बठा लयीसनी वाहता पाणीमां मारेल चिडासना रंगतमा त्यासनी बुडावानं.
7 अनी ते महारोगापाशीन शुध्द ठरावानं माणुसवर सातदाव शितडानं; अनी ते
शुध्द व्हयेल शे आशे सांगीसनी ते जीवता चिडाले जंगलमा सोडी दयावानं;
8 अनी शुध्द होणारा माणुसनी आपला कपडा धवानं, आपला सर्वा केस मुंडन
करानं अनी पाणीघाई आंग धवानं; मंग तो शुध्द व्हयी; त्यानंतर त्यानी छावणीमां
येवानं; त्यानी सातरोज तंबूनी बाहरे राहावानं.
9 सातवारोज त्यानी आपला डोका,दाढी, भुवया हाई म्हणजे आंगवरला
जवळपास बठा केसना मुंडन करानं, आपला कपडा धवानं अनी पाणीघाई आंग
धवानं म्हणजे तो शुध्द व्हयी.
10 आठवा रोजले दोन निर्दोष कोकरू, एक वर्षनी निर्दोष मेंढी, अन्नर्पणाकरता
तेलमा मळेल तीन दशांश एफा मयदा अनी लोगभर तेल हाई सर्वा आणानं.
11 अनी शुध्दी करणारा याजकनी शुध्द करानं माणुसले हाई बठा वस्तूनीसंगे
परमेश्वरनीमोरे दर्शनमंडपना दारपान उभं करानं
12 मंग याजकनी दोषार्पणकराकरता एक कोकरू अनी लोगभर तेल आशी
अर्पानी ती परमेश्वरनीमोरे ओवाळनीनं अर्पण म्हणीसनी अर्पानं.
13 अनी पवित्रस्थानमा जठे पापबळी अनी होमबळी मारतसं तठे ते कोकरू
मारानं; कारण पापबळीपरमानं दोषबळीलेभी याजकनं हक्क शे. हाई अर्पण
परमपवित्र शे.

14 मंग याजकनी दोषबळीन काही रंगत लयीसनी शुध्दकराकरता माणूसनी
उजवा काननं शेंडाले, ऊजवा हातना अंगठाले अनी उजवा पायनं अंगठाले लावानं.
15 याजकनी लोगभर तेलमासले थोडं तेल आपला डावा हातना तळवर वतानं.
16 त्यानी आपला उजवा हातनं बोट आपला डावा हातना तेलमा बूडाईसनी
त्यामासला काही परमेश्वरनीमोरे सातदाव बोटघाई शितडानं.
17 त्याना तळहातवर जे तेल उरेल राही त्यामासला काही लयीसनी याजकनी
शुध्द ठरावानं माणुसनी उजवा काननी शेंडाले अनी उजवा हातनं अनी उजवा पायना
अंगठयासले दोषबळीनं रंगत लावानं.
18 तळहातवर शिल्लक राहेल तेल त्यानी शुध्द ठरावानी माणुसनी डोकाले
लावानं अनी त्यानाकरता त्यानी परमेश्वरनीमोरे प्रायश्चित करानं.
19 मंग याजकनी पापबळी अर्पानं अनी अशुध्दतेपाईन शुध्द ठरावानं त्या
माणुसनीकरता प्रायश्चित करानं; मग त्यानी होमबळी करानं.
20 मंग याजकनी होमबळी अनी अन्नबळी वेदीवर अर्पण करानं अनी त्याकरता
प्रायश्चित करानं, म्हणजे तो शुध्द व्हयी.
21 तो गरीब व्हयी एवढं आणानं त्यानी ऐपत नही व्हयी तर त्या
प्रायश्चित कराकरता वोवाळणीनं एक कोकरू दोषार्पण म्हणीसनी आणानं, अनी
अन्नर्पणकराकरता तेलमा मळेल एक दशांश एफा सपीठ अनी लोगभर तेल आणानं;
22 अनी त्याले मिळतीन तसे दोन होले नाहीते पारवासना दोन पिला आणानं;
त्यामासला एक पापबळी अनी दुसरा होमबळी राहावाले पाहिजे.
23 आठवा रोजले आपला शुध्दीकरणकराकरता त्यानी हाई बठा दर्शनमंडपना
दारपान याजकडे परमेश्वरनीमोरे जावानं.
24 मंग याजकनी दोषर्पणनं कोकरू अनी लोगभर तेल लयीसनी वोवाळनीनं
अर्पण म्हणीसनी परमेश्वरनीमोरे वोवाळानं.
25 मंग दोषर्पण कोकरू मारानं अनी याजकनी त्यासना थोडा रंगत लयीसनी शुध्द
ठरावानं माणुसनी उजवा कानना शेंडाले अनी उजवा हातना अनी उजवा पायनं
अंगठाले लावानं.
26 याजकनी त्या तेलमासला काही डावा हातना तळवर वतानं.
27 अनी आपला उजवा हातनं बोट आपला हातनं तळवरनं तेलमा बुडाईसनी
त्यामासले परमेश्वरनीमोरे सातदाव शितडानं.
28 मंग याजकनी आपला तळहातवरला काही तेल लयीसनी ज्याले शुध्द
ठरावानं त्या माणुसनी उजवा काननं शेंडाले अनी उजवा हातनं अनी उजवा पायनं
अंगठाले दोषबळीना रंगतवर लावानं;

29 याजकना तळहातवर जे उरेल तेल ते शुध्द ठरावानं, माणुसनं डोकाले
परमेश्वरनीमोरे त्यानाकरता प्रायश्चित म्हणीसनी वतानं.
30 मंग त्याले भेटेल व्हतीन त्या होला नाहिते पारवासना पिला यासमाईन एकनं
त्यानी अर्पण करनं.
31 त्याले जे पक्षी मिळेल व्हतीन त्यानामाईन एकनं पापार्पण करानं अनी दुसरा
अन्नार्पणसंगे होमर्पण करानं; हाई परकारं याजकनी शुध्द ठरावानं माणुसकरता
परमेश्वरनीमोरे प्रायश्चित करानं.
32 आंगवर कुष्टरोगना चटा व्हयेल जो माणुसले शुध्दीकरणनी सामग्री मिळाडानं
ताकद नही व्हयी त्या बारामा त्याना नियम हया शेतस.

## घरमासला कोड

33 परमेश्वरनी अहरोन अनी मोशेले सांग;
34 जो कनान देश तुम्हले वतन म्हणीसनी दी राहिनू तठे तूम्ही जवय जाशाल
तवय तुम्ही तुम्हनी वतनना देशमासला एकादा घरले कुष्टरोगना चट्टा उमटाडं.
35 तर ज्यानं ते घर व्हयी त्यानी याजकले जाईसनी सांगानं की मना घरले
कुष्टरोगना चट्टानीगत दखासं.
36 मंग याजकनी आज्ञा करानी की जाईसनी घर दखसू त्याना आगोदर ते रिकामं
करानं; नाहिते एकादा येळले घरमासला बठया वस्तू अशुध्द ठरावानं. मंग याजकनी
मजारमा जाईसनी घर तपासानं.
37 तो चट्टा त्यानी दखानं अनी घरना भितवर हिरवट अनी लालसर रंगन रेघा
पडेल व्हतीन अनी भितमा जायेल वतीन ते.
38 याजकनी घरमाईन दारनीबाहेर जावानं अनी सातरोज ते घर बंद करी ठेवानं.
39 सातवा रोज याजकनी ते घर परत जाईसनी दखानं अनी जर तो चट्टा घरना
भितवर पसरेल व्हयी आशे दखायनं तर
40 याजकनी आशी आज्ञा करानी की डाग राहेल दगडा काढीसनी गावनीबाहेर
अशुध्द जागवर फेकी देवानं.
41 अनी घरना मजारमाईन चारीबाजुले खरवडानं अनी खरवडीसनी काढेल
माती त्यानी गावनीबाहेर अशुध्द जागवर टाकी देवानं.
42 मंग ते दगडना जागवर दुसरा दगड बसाडानं अनी ते घरले नवीन मातीना
गारा करानं.
43 दगड काढानंतर अनी घर खरवडीसनी नवीन गिलावा करानंतर जर परत तो
चट्टा दखावाले लागना.

44 याजकनी लयीसनी तो दखानं अनी घरमा पसरेल शे आशे त्याले दखायनं
तर तो घरमा पसरत जाणारा कुष्ट शे आशे त्यानी ठरावानं; ते अशुध्द शे.
45 मंग त्यानी ते खंदी टाकानं त्यानं दगड,लाकूड अनी बठा माती त्यानी तठेईन
काढीसनी गावनीबाहेर अशुध्द जागवर फेकी देवानं.
46 घर बंद व्हयी जर कोणी तठे जाईसनी राहिना तर तो संध्याकाळपावोत
अशुध्दच राहावानं.
47 अनी कोणी ते घरमा झोपेल व्हयी तर त्यानी आपला कपडा धवानं; अनी
घरमा कोणी अन्न खायेल व्हयी तर त्यानीभी आपला कपडा धवानं.
48 याजकनी मजारमा जाईसनी दखानंतर त्याले जर दखामां व्हनं की घरले
गिलावा करानंतर काही चट्टा नही व्हन व्हयी, तर त्याना तो चट्टा दुर व्हानंतर
त्यानी ते शुध्द ठरावानं.
49 त्या घरनं शुध्दीकरनकराकरता दोन चिडा, गंधसरूनं लाकूड, किरमिजी रंगनं
कपडा अनी एजोब हाई त्यानी लयानं.
50 त्यानी एक चिडा वाहाता पाणीमां मातीना भांडामा मारानं.
51 मंग त्यानी गंधसरूनं लाकूड, एजोब, किरमिजी रंगनं कापड अनी जीवत
चिडा हाई लयीसनी त्या मारेल चिडासना रंगतमा अनी वाहाता पाणीमा बूडाईसनी
ते घरवर सातदाव शितडानं.
52 ते चिडानं रंगत, वाहता पाणी, तो जीवत चिडा, गंधसरूनं लाकूड, एजोब,
किरमिजी रंगनं कापड यानकडतीन ते शुध्द करानं.
53 मंग त्यानी जीवत चिडा गावनीबाहेर सोडी देवानं, हाई परकारं त्यानी घरनं
प्रायश्चित करं म्हणजे ते शुध्द व्हयी.
54 बठा परकारनं कुष्टरोग चट्टा, चाई,
55 कपडासवरला नाहिते घरवरला कुष्टरोग,
56 सूज, खवले, पांढरा डाग हाई बठा बारामा हाई नियम शे;
57 हाई शुध्द कवय अनी अशुध्द कवय हाई ठरावानाबारामां हाई नियम शे; हाई
कुष्टरोगना इषयीना शे.

# 15

## शरीरमाईन वाहणारा अशुध्द स्राव

1 परमेश्वरनी मोशे अनी अहरोनले सांग,
2 इस्राएल लोकेसले सांग, एकादा माणुसनी आंगमाईन स्राव व्हयी ते अशुध्द
समजानं.

3 हाई स्राव चालू राहो की बंद राहो, ते अशुध्दस शे.
4 स्राव व्हनारा माणुस ज्या अंथरूनवर झोपी त्याले अशुध्द समजानं अनी ज्या
वस्तुवर तो बसी तिभी वस्तु अशुध्द समजानं.
5 अनी जो कोणी अंथरूनले हात लाई त्यानी आपला कपडा धवानं, पाणीघाई
आंग धवानं अनी संध्याकाळपावोत अशुध्दस राहावानं.
6 स्राव व्हयले माणुस जी वस्तुवर बठसं व्हयी अनी तिनावर कोणी बठं तर त्यानी
आपला कपडा धवानं, पाणीघाई आंघोळ करानं अनी संध्याकाळपावोत अशुध्दस
राहावानं.
7 स्राव व्हयेल माणुसनी आंगले कोणी हात लावं तर त्यानी आपला कपडा धवानं,
पाणीघाई स्नान करावे अनी संध्याकाळपावोत अशुध्दस राहावानं.
8 स्राव व्हयेल माणुसनी एकादा शुध्द माणुसवर थुंक तर त्यानी माणुसनी आपला
कपडा धई टाकानं अनी संध्याकाळपावोत अशुध्दस राहावानं.
9 स्राव व्हयेल माणुस जे वाहानंन वापर करी ते अशुध्द समजानं.
10 त्याना आंगना खालना एकादी वस्तुले कोणी हात लाई दिद् तर त्यानी
संध्याकाळपावोत अशुध्दस राहावानं. अनी जो कोणी ती वस्तुले उचली त्यानी
आपला कपडा धवानं, पाणीघाई अंघोळ करानं अनी संध्याकाळपावोत अशुध्दस
राहावानं.
11 स्राव व्हयेल माणुसनी हात धवाशिवाय एकादा माणुसले हात लाई दिद् तर
त्यानी आपला स्नान करानं पाणीघाई आंग धवानं अनी संध्याकाळपावोत अशुध्दस
राहावानं
12 स्राव व्हयेल माणुसनी एकादा मातीना भांडाले हात लाई दिद् तर ते भांड फोडी
टाकानं, त्यानी हात लावं ते भांड लाकूडनं व्हयीते पाणीघाई धवानं.
13 स्राव व्हयेल माणुस आपला स्रावपाईन बरा व्हयीना तर त्यानी आपला
शुध्दीकरणकराकरता त्यानी सात दिवस मोजानं अनी आपला कपडा धईसनी वाहता
पाणीमा स्नान करानं, म्हणजे तो शुध्द व्हयी
14 आठवा रोजले त्यानी दोन होला नाहिते पारवासना दोन पिला लयीसनी
दर्शनमंडपना दारपान परमेश्वरनीमोरे जाईसनी याजकडे ते देवानं.
15 मंग याजकनी त्यामासला एकनं पापार्पण अनी दुसरानं होमर्पण करानं अनी
त्याना स्राववास्तव परमेश्वरनीमोरे त्यानाकरता प्रायश्चित करानं.
16 एकाद माणुसनं वीर्यपतन व्हयनं व्हयी तर त्यानी आपला बठा आंग पाणीघाई
धईसनी संध्याकाळपावोत अशुध्द राहावानं.

17 ज्या कपडावर नाहिते चामडावर वीर्यपतन व्हयनं व्हयी तेभी पाणीघाई
धईसनी संध्याकाळपावोत अशुध्द राहावानं
18 माणुसनी बाईनीसंगे संभोग कर व्हयी त्या दोन्हीसनी पाणीघाई आंग धईसनी
संध्याकाळपावोत अशुध्द राहावानं.
19 जर एकादी बाईले पाळी वनी तर तीनी सात रोज अशुध्द राहावानं; जर कोणी
तिले हात लावं व्हयी त्यानी संध्याकाळपावोत अशुध्द राहावानं
20 ती अशुध्द राहास तोपावोत ज्या वस्तुवर ती झोपी नाहिते बठी त्या बठया
वस्तु अशुध्द समजानं.
21 जर कोणी तिना अंथरूनले हात लाई दिद् त्यानी आपला कपडा धवानं,
पाणीघाई स्नान करानं अनी संध्याकाळपावोत अशुध्दस राहावानं
22 ती बसले कोनतेभी वस्तुले कोणी हात लाई दिद् तर त्यानी आपला कपडा
धवानं, पाणीघाई स्नान करानं अनी संध्याकाळपावोत अशुध्द राहावानं.
23 तिना अंथरूनले नाहिते जी वस्तुवर ती बसेल व्हयी तिले हात लावणाऱ्यानी
संध्याकाळपावोत अशुध्द राहावानं.
24 एकादा माणुसनी तिनेसंगे संभोग करं अनी तिन विटाळ त्याले लागनं तर
त्यानी सातरोज अशुध्द राहावानं अनी ज्या अंथरूनवर तो झोपी त्याले अशुध्द
समजानं.
25 एकादी बाईले तिना मासिक दिवसनापेक्षा जास्त दिवस स्राव होत व्हयी नाहिते
ते मासिक पाळीना येळपेक्षा जास्त व्हत व्हयीते तिने बठा दिवस अशुध्द राहावानं.
26 तिले मासिक पाळी येत व्हयी तर त्या बठा दिवस ती ज्या अंथरूनवर झोपी
तर ते विटाळना अंथरूण समजानं; अनी ती जी वस्तुवर बठी तर ती मासिक पाळीना
विटाळपरमानं अशुध्द समजानं.
27 जर कोणी त्या वस्तुसले हात लाई ते अशुध्द समजानं अनी त्यानी आपला
कपडा धवानं,पाणीघाई आंग धवानं अनी संध्याकाळपावोत अशुध्द राहावानं
28 त्या बाईनी आपला मासिक पाळी शुध्द व्हवानंतर आजुन सात रोज मोजान;
त्यानंतर तिले शुध्द समजानं.
29 आठवा रोजले तिनी दोन होला नाहिते पारवासना दोन पिला लयीसनी
दर्शनमंडपना दारपान याजककडे जावानं.
30 मंग याजकनी एकनं पापार्पण अनी दुसरानं होमार्पण करानं अनी तिना
विटाळना अशुध्दतामुळे तिनाकरता याजकनामोरे पाप छाकाणं करानं.
31 हाई परकारं तुम्ही इस्राएल लोकेसले त्यासना अशुध्दतापाईन दारू ठेवानं

म्हणजे त्याना जोडे राहेल मना निवासस्थान त्या भ्रष्ट करनार नही.
32 स्राव व्हयीसनी नाहिते वीर्यपतन व्हयीसनी जो माणुस अशुध्द व्हसं
33 जी बाईले मासिक पाळी व्हस अनी जो माणुसले नाहिते बाईले स्राव व्हस,
जो माणुस अशुध्द बाईनीसंगे संभोग करस, त्यानाबारामा ह्या नियम शेतस;

# 16

## प्रायश्चितना दिन

1 अहरोना दोन पोर्‍या परमेश्वरनाजोडे जावामुळे मरनात परमेश्वरनी मोशेले सांग
बोलना;
2 परमेश्वरनी मोशेले सांग; तुना भाऊ अहरोन याले सांग, कोशवर शे ते
दयासनामोरे अंतरपटना मजारना पवित्र स्थानमा तु कवयभी जावानं नही, गया ते
मरशी, कारण दयासना मेघवर मी दर्शन देस राहासु.
3 जवय अहरोन पवित्रस्थानमां प्रवेश करी तवय त्यानी पापार्पण कराकरता एक
बैल अनी होमार्पण कराकरता एक मेंढा लयी येवानं.
4 त्यानी सणना कपडाना पवित्र अंगरखा घालानं, सणना कडाना चोळणीघाई
आपला आंग झाकानं सणना कमरबंदघाई आपली कंबर बांधानी अनी सणना फेटा
बांधानं, हाई बठा पवित्र कपडा शेतस; त्यानी पाणीघाई स्नान करीसन हाई कपडा
घालीसनी येवानं.
5 मंग त्यानी इस्राएलना मंडळीकडतीन पापार्पण कराकरता दोन बोकडया अनी
होमार्पणना एक मेंढा लयी येवानं.
6 अहरोननी त्यानाकरता आणेल पापार्पणना बैल अर्पण करिसनी सोताकरता
अनी स्वताना घराणाकरता प्रायश्चित करानं.
7 मंग त्यानी त्या दोन बोकडया लईसनी दर्शनमंडपना दारपान परमेश्वरनीमोरे
ठेवानं.
8 अहरोननी त्या दोन बोकडयासवर चिठया टाकानं, एक चिठी परमेश्वरकरता
अनी दुसरी पाप वाही लयी जावाकरता.
9 ज्या बोकडयासवर परमेश्वरनी नावनी चिठी निघी ते अहरोननी पापार्पण
म्हणीसनी बळी देवानं.
10 ज्या बोकडयासवर पाप वाही लयी जावानं बारामां चिठी निघी त्याले
परमेश्वरनीमोरे जीवता उभा करानं अनी त्यानाकडतीन प्रायश्चित व्हावाले पाहिजे;
अनी तो बोकडया पाप वाही लेवाकरता जंगलमां सोडी देवानं.

11 मंग सोताकरता पापर्पण कराना वासरू अहरोननाजोडे आणानं अनी ते
मारीसनी आपलाकरता अनी आपला घरानाकरता प्रायश्चित करानं.
12 अनी परमेश्वरनीमोरे राहेल वेदीनावरतीन जळेल निखारासना भरेल धुपाटनं
लेवानं अनी कुटेल बारीक ओंजळभर सुंगधी धूप आंतरपटना मजारमा लयानं.
13 ते धुप परमेश्वरनीमोरे आगवर आशे घालानं की त्याना धुरघाई
साक्षपटलनावरना दयासनले भरि टाकानं, म्हणजे ते मराऊ नहीं.
14 मंग त्यानी बैलन काही रंगत दयासननं पूर्व भागले बोटघाई शितडानं; अनी
ते रंगत बोटघाई त्या दयासननामोरे सातदाव शितडानं.
15 मंग त्यानी लोकेसनीकरता आणेल पापार्पणना बोकडया मारानं; त्याना
रंगत अंतरपटना मजार लयी जावानं अनी जशे त्यानी वासरूना रंगतना करानं तशे
बोकडयानं रंगतनं करानं, म्हणजे ते दयासननावर अनी दयासननामोरे शितडानं.
16 आजून त्यानी इस्राएल लोकेसनी अशुध्दता अनी अपराध यानाकरता
म्हणजे त्याना बठा पापसकरता पवित्रस्थानकरता प्रायश्चित करानं; माणसासनी
अशुध्दताघाई व्याप्त व्हईसनी त्यासनामा राहणारा दर्शनमंडपनाकरता तशे करानं.
17 अहरोन प्रायश्चित कराकरता पवित्रस्थानमां प्रवेस करी तवयपाईन तो
आपलाकरता, आपला घराणाकरता अनी इस्राएलनी बठी मंडळीकरता प्रायश्चित
करीसनी बाहेर येईपावोत त्या दर्शनमंडपमा दुसरा कोणी भी माणुस नही राहावाले
पाहिजे.
18 मंग तो तथाईन निघीसनी परमेश्वरनीमोरे वेदीनाजोडे जाईसनी तिनाकरता
प्रायश्चित करानं; बैल अनी बोकडयानं काही रंगत लयीसनी ते वेदीनं चारी बाजुना
शिंगासले लावानं.
19 अनी काही रंगत लयीसनी आपला बोटघाई सातदाव तिनावर शितडीसनी ती
इस्राएलना अशुध्दतापाईन मुक्त करीसनी पवित्र करानी.

### प्रायश्चितना बोकड्या

20 मंग पवित्रस्थान, दर्शनमंडप अनी वेदी यानाकरता प्रायश्चित करानं सरानंतर
तो जीवता बोकडया जोडे आणानं.
21 अहरोनी आपल दोन्ही हात ते जीवत बोकडयानं डोकावर ठेईसनी इस्राएल
लोकेसनी बठा दुष्कर्म अनी अपराध यासना म्हणजे बठा पापना अंगीकार करानं;
अनी ती बठी तो बोकडयानं डोकावर ठेईसनी त्याले नेमेल माणुसनी हातघाई
जंगलमा धाडी देवानं.
22 तो बोकड त्याना बठा दुष्कर्मना भार त्यानावर लिईसनी त्या बोकडयाले
जंगलमा सोडी देवानं; त्या मानुसनी त्या बकराले जंगलमा सोडी देवानं.

23 मंग अहरोन दर्शनमंडपमा येईसनी पवित्रस्थानमा जावानी आगोदर परिधान
करेल सणसना कपडा काढीसनी ठेई देवानं
24 मंग त्यानी एकादा पवित्र ठिकाणले पाणीघाई स्नान करानं अनी आपला कपडा
घालीसनी बाहेर जाईसनी सोताकरता अनी लोकासना होमर्पण करीसनी सोताकरता
अनी लोकसकरता पापछाकी.
25 पापार्पणना चरबीना त्यानी वेदीवर होम करानं
26 पाप वाही लयी जावानीबारामा बोकडं ज्या माणुसनी सोडेल शे त्यानी आपला
कपडा धवानं, पाणीघाई आंग धवानं अनी मंग छावणीमा येवानं.
27 पापार्पणना ज्या बैल अनी पापार्पणना ज्या बोकडयासना पवित्र ठिकाणले
प्रायश्चित कराकरता लयी जावामा येई, त्या दोन्ही तळनाबाहेल लयी जावानं अनी
त्याना कातडा, मास अनी शेन हाई आगमा जाळी टाकानं.
28 ते जाळणारानी आपला कपडा धवानं, पाणीघाई स्नान करानं अनी मंग
छावणीमा येवानं.

### पापझाकाना दिन मानानं

29 तुम्हले कायमनं आशे नियम राहावाले पाहिजे; सातवा महिनानी दशमीले
तुम्ही आपलं जीवले त्रास देवानं; त्यारोजले काम करानं नही, मंग ते स्वदेशना राहो
की तुम्हना राहणारा परदेशी राहो.
30 कारण त्यारोज तुम्ही शुध्द व्हावानं म्हणीसनी तुमनाकरता प्रायश्चित करामा
येई; पमेश्वरनीमोरे तुम्ही आपला बठा पापसपाईन शुध्द ठरावामा येई.
31 तुम्हले हाई परम विश्नामनं शाब्बाथ शे; हाई रोज तुम्ही आपला जीवले क्लेश
देवानं. हाई कायमनी विधी शे.
32 ज्याले आपला वडीलनं जागवर याजक व्हावाकरता अभिषेक अनी शुद्ध
व्हई त्यानी प्रायश्चित करानं; म्हणजे सणना कपडा घालीसनी.
33 पवित्र स्थान, दर्शनमंडप अनी वेदी यानाकरता त्यानी प्रायश्चित करानं अनी
याजक अनं मंडळीमासला दुसरा बठा माणसे यासनाकरताभी प्रायश्चित करानं.
34 इस्राएल लोकेसकरता वर्षमा एकदाव त्यासना बठा पापसना प्रायश्चित करानं,
म्हणीन हाउ तुमले कयमना नियम शेतस, परमेश्वरनी मोशेले आज्ञा देल परमानी
त्यानी करं.

# 17

### अर्पण करानी जागा

1 परमेश्वर मोशेले बोलना,

2 अहरोन, त्याना पोऱ्या अनी बठा इस्राएल लोक यासले सांग की परमेश्वरनी
आशी आज्ञा देयेल शे;
3 इस्राएल घराणामाईन एखादा माणूसनी छावणीमा किवा छावणीइना बाहेर बकरा
मारानं,
4 दर्शनमंडपना दारपान परमेश्वरनी निवासमंडपनामोरे परमेश्वरले अर्पण करानं
तो नही लवाऊ नही, तर त्या माणुसना हत्यानं दोष लागी; त्यानी खून करेल शे
म्हणून त्याना लोकेसनामोरे त्याना नाश व्हयी.
5 याना हेतू आशे शे की इस्राएल लोक आपला यज्ञपशू मोकळी जागामा
मारत व्हतात, ते त्यानी दर्शनमंडपना दारपान याजककडे परमेश्वरनीमोरे लयीसनी
परमेश्वरकरता शांतिर्पण म्हणीसनी अर्पण करानं.
6 याजकनी त्याना रंगत दर्शनमंडपना दारपान परमेश्वरनी वेदीवर शितडानं अनी
त्याना चरबीना परमेश्वरले सुवासिक हवन म्हणीसनी होम करानं.
7 जे व्यभिचारी इचारतीन बोकड देवतासनीमागे लागीसनी त्यासले यज्ञपशूनं
अर्पण करतस त्यासनी यानापूढेतीन त्यास यज्ञ करानं नही, हाई तुम्हले कायमना
अनी पिढयानपिढयाना विधी समजानं.
8 तु त्यासले सांग की इस्राएल घराणासमाईन नाहिते त्यामा राहाणारा उपरी
लोकेसमाईन कोणी होमार्पण नाहिते शांत्यर्पण करी,
9 अनी ते दर्शनमंडपना दारपान परमेश्वरले अर्पण कराकरता लवानं नही, तर
त्याना लोकेसनीमोरे नाश व्हावाले पाहिजे.
10 इस्राएल लोकेसमाईन नाहिते त्यासमा राहाणारा उपरी लोकेसमाईन कोणी
कोणतेभी परकारंन रंगतना सेवन करं तर त्या माणुसना विरोध व्हईसनी त्याना
लोकेसनामोरे त्याना नाश करसू.
11 कारण शरीरना जीव रंगतमा राहास अनी तुम्हना जीवकरता प्रायश्चित
व्हावाले पाहिजे म्हणून ते तुम्हले वेदीवर देयेल शे, कारण जीवकरता प्रायश्चित
रंगतघाईस व्हसं.
12 हयानाकरता मी इस्राएल लोकेसले आज्ञा दिदि की तुम्हनामाईन कोणी रंगतना
सेवन कराले नही पाहिजे, तुम्हनामां राहाणारा परदेशीसनीभी नही कराले पाहिजे.
13 पण इस्राएल लोकेसमाईन नाहीते त्यासमा राहाणारा उपऱ्यासमाईन कोणी
खावासारखा पशूनं नाहिते चिडासना शिकार करं तर त्यानी त्याना रंगत काढीसनी
ते माटीघाई झाकानं.
14 कारण प्राणीमात्राना जीवनबारामा म्हणशा ते त्यासना रंगत हाईच त्यासना
जीवन शे; याकरता इस्राएल लोकेसले मी आज्ञा देयेल शे की कोणतेभी जनावरनं

रंगत सेवन करानं नही, कारण बठा जनावरसना जीवन हाईच रंगत शे; ते जे कोणी
सेवन करं त्याना नाश व्हावाले पाहिजे.
15 एकाद माणुस, मंग तो स्वदेशना राहो नाहिते परदेशना राहो. त्यानात्याना मरेल
नाहिते फाडेल जनावरसना मास खाद तर त्यानी आपला कपडा धईसनी पाणीघाई
आंग धवानं स्नान करानं अनी संध्याकाळपावोत अशुध्दस राहावानं म्हणजे तो शुध्द
व्हयी.
16 जर त्यानी आपला कपडा धवात नही अनी स्नान करं नहीते त्याना पापनं फळ
त्या मिळी.

# 18

## अनैतीक संबंधना बारामा

1 परमेश्वर मोशेले बोलना,
2 इस्राएल लोकेसले सांग की मी परमेश्वर तुम्हना देव शे.
3 तुम्ही मिसर देशमा राहात व्हतात तठेन्या चालीरितीसना अनुकरण करानं नही;
अनी ज्या कनान देशमा लयी जाई राहीनू शे, तठेन्या चालीरितीसना अनुकरण करानं
नही अनी तठेन्या विधी परमानं चालानं नही.
4 मना नियम पाळानं अनी म्हनास विधी मान्य करीसनी त्यानापरमानं वागान;
मी तुम्हना देव यहोवा शे.
5 तुम्हीन म्हना विधी अनी नियम पाळानं; त्या जो पाळी तो त्यानामा जीवता
राही; मी परमेश्वर शे.
6 तुम्हना माईन कोणी आपला जोडेना नातेवाईकसना काया उघडी कराले
त्यासपान जावानं नही; मी परमेश्वर शे.
7 तु आपला वडीलनी म्हणजे आपली मायनी काया उघडी करानं नही, ती तुन्ही
माय शे म्हणून तिनी काया उघडी करानं नही.
8 आपली सावत्र मायनी काया उघडी करानं नही; ती तुन्ही वडिलनीस काया
शे.
9 आपली बहीण मंग ती सगी राही का सावत्र राहो; ती घरमा जन्म व्हयेल राहो
का बाहेर जन्म व्हयेल राहो, तिनी काया उघडी करानी नही.
10 आपली नात, मंग ती पोऱ्यानी पोर राहो का पोरनी पोर राहो तिनी काया
उघडी करानी नही, तिनी काया ती तुनीस शे.
11 वडीलले व्हयेल वडीलनी व्हयेल पोर ती तुनी बहीण शे म्हणून तिनी काया
उघडी करानी नही.

12 आपली आत्यानी काया उघडी करानी नही. ती तुनी वडीलनी बहीण शे.
13 आपली मावशीनी काया उघडी करानी नही; कारण ती तूनी मायनी बहीण
शे.
14 आपला चुलतानी काया उघडी करानी नही म्हणजे त्यानी बायकोनीसंगे
संभोग करानं नही; ती तुनी चुलती शे.
15 आपली सुननी काया उघडी करानी नही; ति तुनी पोर्यानी बायको शे; म्हणून
तिनी काया उघडी करानी नही.
16 आपली भावजायनी काया उघडी करानी नही; ती तुनी भाऊनी काया शे.
17 एकादी बायनी अनी तिनी पोरनी दोन्हीसनी काया उघडी करानी नही; तिनी
नात मंग ती तिना पोर्यानी पोर राहो नाहिते पोरनी पोर राहो, तिले आपली बायको
करिसनी तिनी काया उघडी करानी नही; त्या जोडेना नाता शेत. आशे करानं म्हणजे
मोठ पाप शे.
18 तु तुनी बायकोनी बहीणले आपली बायको करिसनी तिले सवत करानं नही;
ती जीवत राहीसनी तिनी बहीणनी काया उघडी करानं नही.
19 बाय ऋतुमती व्हावानंतर ती अशुध्दस राहास तोपावत तिनी काया उघडी
कराकरता तिना जोडे जावानं नही.
20 तु आपली शेजारनी बाईनीसंगे कुकर्म करिसनी अशुध्द व्हवानं नही.
21 आपला संतानमाईन एकादानं मोलख देवना करता आगनं होम करानं नही;
तुना देव यहोवा याना पवित्र नावले कलंक लावानं नही; मी परमेश्वर शे.
22 स्रीसंभोगपरमानं पूरुषसंभोग करानं नही, ते अमंगळ काम शे.
23 कोणतेभी जनावरनीसंगे संभोग करिसनी अशुध्द व्हवानं नही; बाईनी
जनावरनीसंगे कुकर्म कराले त्यानामोरे उभं राहावानं नही; हाई विपरीत कर्म शे.
24 आशापरकारनं कोणतेभी कर्म करीसनी भ्रष्ट व्हवानं नही; कारण ज्या देशले
मी तुम्हनामोरेतीन घालाडानार शे त्या आशा बठा कर्म करीसनी भ्रष्ट व्हयेल शेतस.
25 त्यासना देश भ्रष्ट व्हयेल शे, त्यासनं दुष्टतामुळे मी त्यासना समाचार लि राहीन्
शे अनी तो देश आपला रहिवाशासले वकी टाकेल शे.
26 हयानाकरता तुम्ही मना विधी अनी नियम पाळानं अनी स्वदेश अनी
तुमनामासला विदेशी उपरी यासनामाईन कोणी भी आशे अमंगळ काम करानं नही.
27 कारण तुम्हना आगोदर हाई देश राहाणारा लोकेसनी आशे बठा अमंगळ कर्म
करामुळे हाई देश अशुध्द व्हयेल शे.
28 तुमना आगोदर ज्या लोक हाई देशमा राहात व्हतात त्यासले जशे हाई देशनी
वकी टाकं, तशे तुम्ही देश अशुध्द करं तुम्हलेभी वकी टाकाले नही पाहिजे;

29 ज्या कोणी आशे अमंगळ कर्म करतीन त्या बठासना त्यासना लोकेसनामोरे
नाश व्हयी.
30 हाई ज्या आज्ञा मी तुम्हले देयेल शे त्या तुम्ही पाळानी; तुमनआगोदर प्रचलित
राहेल अमंगळ रिवाजपरमानं तुम्ही चालानं नही अनी त्यानामुळे अशुध्द व्हवानं
नही; मी परमेश्वर तुमना देव शे.

# 19

## पवित्रता अनं न्यायना नियम

1 परमेश्वर मोशेले बोलना
2 इस्राएलन्या बठया मंडळीसले सांग, तुम्ही पवित्र राहावानं, कारण मी परमेश्वर
तुम्हना देव पवित्र शे.
3 तुम्ही आपला मायेले अनी बापले यासले भिवानं अनी म्हना शाब्बाथ दिवस
पाळान; मी परमेश्वर तुम्हना देव शे.
4 तुम्ही मुर्तीसकडे वळानं नही अनी आपलाकरता ओतीव देव करानं नही; मी
परमेश्वर तुम्हना देव शे.
5 जवय तुम्ही परमेश्वरकरता शांत्यर्पणकराकरता यज्ञ करशाल तवय मी तुम्हले
प्रसन्न व्हसुं आशे ते करानं.
6 त्या अर्पणनं मास यज्ञानं रोज अनी दुसरा रोज खावानं, पण तिसरा रोजले काही
उरनं व्हयी ते आगमा जाळी टाकानं.
7 तिसरा रोजले ते खावानं अमंगळ शे, ते मान्य व्हवाऊ नही.
8 जो कोणी त्यामासला खाई त्याले त्याना दुष्कर्मानं फळ भेटी, कारण
त्यानी परमेश्वरनी पवित्र वस्तुले दूषित करेल शे आशे व्हईल; त्या माणसासना
स्वजनासमाईन नाश व्हावाले पाहिजे.
9 जवय तुम्ही तुमना देशना पिकासनी कापणी करशाल तवय तु आपला शेतना
कोपराकापरासमासला पिक झाडीसनी बठा कापानं नही अनी पिक काढानंतर
त्यासमासला सरवा येचानं नही.
10 आपला द्राक्षमळाभी झाडीसनी ते खुडानं नही, द्राक्षमळामासला पडझड
गोळा करानं नही; गरीब अनी उपरी यासनाकरता ते राहू देवानं,मी परमेश्वर तुम्हना
देव शे.
11 तुम्ही चोरी करानं नही येरायेरनं कपट करानं नही अनी खोट बोलानं नही.
12 मना नावानी खोटी शपथ लिईसनी आपला देवनी नावले कलंक लावानं नही.
मी परमेश्वर शे.

13 आपला शेजारनावर जुलूम करानं नही अनी त्याले लूटा नही, मजूरनी मजूरी
रातभर आपलाजोडे ठेवानं नही.
14 बहिराले शिवीशाप देवानं नहीं; नहित्ये आंधळाले ठोकर लागी अशी वस्तू
त्याना पुढे ठेऊ नको, तू आपाला देवले भिवानं, मी परमेश्वर शे.
15 न्याय करतांना अन्याय करानं नही, दारींद्रेनी दारिद्रवर नजर ठेवानं नही,
मोठानं तोंड दखीसनी न्याय करानं नही, तर आपला शेजारनाना खरा मनतीत न्याय
कर.
16 आपला लोकासमा आठेतठे चुगल्या करत फिरानं नही,आपला शेजारनानावर
जीववर उठानं नही, मी परमेश्वर शे.
17 आपला मनमासुध्दा भाऊनीबारामा व्देष करानं नही, आपला शेजारनाले
दटाडानं नाहिते तो तुना माथा पाप लागी
18 बदला लेवानं नहीं; आपला भाऊबंदमाईन कोणवर दावा करानं नही, आपला
शेजारनावर प्रेम करानं; मी परमेश्वर शे.
19 मना विधी पाळानं, आपला जनावरसना येगळा जातसना जनावरसनासंगे
ताळमेळ बसू देवानं नही. आपला वावरमा दोन जातीसना बिवारा एकजागे
मिळाडानं नहीं; दोन परकारनं सुत मिळाडेल कपडा आंगवर घालानं नही.
20 एकादी बाई दासी शे अनी तिनी एकादा माणुसनीसंगे संभोग करं पण ती
एकादानी बायको व्हयी; तिनासंगे कोणी कुकर्म करं व्हयीते त्या दोन्हीसले शिक्षा
व्हावाले पाहिजे; पण तिनी मुक्तता व्हयेल नही व्हयी तर तिले मारानं नही.
21 मंग माणसुनी दर्शनमंडपना दारपान परमेश्वरनीमोरे दोषर्पणकराकरता एक
मेंढा लई येवानं.
22 अनी त्यानी करेल पापसनीकरता दोषर्पणना मेंढानीद्वारे त्यानाकरता याजकनी
परमेश्वरनीमोरे प्रायश्चित करानं, म्हणजे त्यानी करेल पापसनी क्षमा मिळी.
23 तुम्ही त्या देशमा जावानंतर खावाकरता येगळं-येगळं झाड लावशात तवय
तीन वरिषपावोत त्यासना फळ निशिध्द समजानं, त्या खावानं नही.
24 चौथा वरिसले त्या बठा फळ परमेश्वरनी उपकारस्मरण करता पवित्र
समजानं.
25 मंग पाचवा वरिषले त्यासना फळ खावानं म्हणजे त्यासमाईन तुम्हले बराच
फळ भेटतीन. मी परमेश्वर तुम्हना देव शे.
26 तुम्ही कोणतेबी मास रंगतनासंगे खावानं नहीं; तुम्ही जादु-टोना करानं नही
अनी शकूनमुहर्त दखानं नही.
27 आपला डोकानं घेरा ठेवानं नहीं; आपला दाढीना कोपरा काढीसनी तिले

कूरूप बनाडानं नही.
28 कोणी मरेल व्हयीते आपाला आंगले इजा करानं नही, आपला आंग गोंदानं
नही; मी परमेश्वर शे.
29 आपली पोरले अशुध्द करीसनी तिले वेशा होऊ देवानं नही; वेशागमनमुळे
देश दुष्टतातीन भरी जाई आशे करानं नही.
30 मना शाब्बाथ पाळानं अनी मना पवित्रस्थानना बारामा आदर करानं; मी
परमेश्वर शे.
31 पंचाक्षरसना अनी चेटकासनी मागे लागानं नही; त्यासना मागे लागीसनी
अशुध्द व्हवानं नही; मी परमेश्वर तुम्हना देव शे.
32 पिकेल केसासनीमोरे उठीसनी उभं ऱ्हाय; म्हातारासले मान देवानं; आपला
देवले भिवानं; मी परमेश्वर शे.
33 एकाद विदेशी माणुस तुम्हना देशमा तुम्हनासंगे राहास व्हयी तर त्याले त्रास
देवानं नही.
34 तुम्हनाबरोबर राहाणारा विदेशी माणुसले तुम्ही स्वदेश माणुसनीसारखा ठेवानं
अनी त्यानावर आपलासारखाच प्रेम करानं; कारण तुम्ही मिसर देशमासला परदेशी
व्हतात. मी परमेश्वर तुम्हना देव शे.
35 न्याय करामा, मोजणी करामा, वजन तोलामा अनी माप करामा काही अन्याय
करानं नही.
36 खरा तागडा, खरा वजन, खरा *एफा अनी खरा हिन हाई तुम्हनाजोडे
राहावाले पाहिजे; ज्यानी तुम्हले मिसर देशमाईन आणेल शे तो मी परमेश्वर तुम्हना
देव शे.
37 त्याकरता तुम्ही मना बठा विधी अनी बठा नियम मान्य करीसनी पाळानं;
मी परमेश्वर शे.

# 20

## आज्ञा मोडामुये व्हणारी शिक्षा

1 परमेश्वर मोशेले बोलना
2 इस्राएल लोकेसले आजुन आशे सांग; इस्राएल लोकेसमाईन नाहिते इस्राएल
लोकेसमा राहानारा उपऱ्यासमाईन कोणी आपला अपत्य मोलखा अर्पण करं त्याले
मारी टाकानं; देशना लोकेसनी त्याले दगडमार करानं

* 19:36 19:36 दहा किलोचे माप

3 मी त्याना विरोधी व्हयीसनी त्याना स्वजनासनमोरे नाश करसु; कारण त्यानी
अपत्य मोलख देवताले देईसनी मना पवित्रस्थानले अशुध्द करेल शे अनी मना
पवित्र नावले कलंक लायेल शे.
4 मोलख देवताले आपला अपत्य अर्पण करनाराकडे देशमासला लोकेसनी
कानाडोळा करीसनी त्याले मारी टाकानं.
5 तर मी त्या माणुसले अनी त्याना कूटुंबले विरोधी व्हयीसनी त्याना अनी जो
कोणी त्यानासारखा व्यभिचार मनतीन मोलख देवताले धरतीन, त्या बठासना नाश
करी टाकसु.
6 जो माणुस व्यभिचार मनतीन पंचाक्षरी अनी चेटका यासना मांगे लागी त्याले
विरोध व्हयीसनी त्याना नाशे करी टाकसु.
7 म्हणुत तुम्ही स्वताले पवित्र करिसनी पवित्र राहावानं; कारण मी परमेश्वर
तुमना देव शे.
8 तुम्ही मना विधी मान्य करिसनी पाळानं; तुम्हले पवित्र करनारा मीच परमेश्वर
शे.
9 आपला बापले अनी मायले जो शिव्याशाप देस त्यासले नक्की मारी टाकानं;
जो आपला बापले अनी मायले शिव्याशाप देई त्याना रंगत त्याना माथाले लागी.
10 कोणी एकादी बाईनीसंगे संभोग करी तर आपला शेजारनी बाईनीसंगे
व्यभिचार करणारा तो जार अनी ती जारनी या दोन्हीसले नक्की मारी टाकानं.
11 जो आपला बापनी बाईनीसंगे झोपना तर तो आपली बापनी काया उघडी
करसं त्या दोन्हीसले नक्की मारी टाकानं; त्यासना रंगत त्यासना माथाले लागी.
12 कोनी आपली सुननीसंगे झोपना तर त्या दोन्हीसले नक्की मारी टाकानं;
त्यासना कर्म विपरित शे; त्यासना रंगत त्यासनास माथाले राही.
13 कोनी स्त्री-स्त्रीसंगेझोपी किवा पुरुषप-पुरुषसंगेझोपी तर त्या दोन्हीसना हाई
अमंगळ कर्म शे. त्यासले नक्की मारी टाकानं. त्यासना रंगत त्यासनास माथाले
राही.
14 एकादी बाई अनी तिनी माय या दोन्हीसले कोणी ठेवं तर ते महापाप शे; तो
माणुस अनी त्या दोन्ही बाया यासले आगमा जाळी टाकानं; तुम्हनामं आशे दुष्कर्म
राहावाले नही पाहिजे.
15 एकादा माणुसनी एकाद जनावरनीसंगे झोपना तर त्याले मारी टाकानं; अनी
ते जनावरलेबी मारी टाकानं
16 एकादी बाई कुकर्म कराले एकादा जनावरकडे गयी तर तिले अनी जनावरले
मारी टाकानं; त्यासना रंगत त्यासनास माथाले राही.

17 कोणी आपली बहीणले, मंग ती त्यानी बापनी पोर असो नाहिते त्यानी मायनी
पोर असो, आपली बायको करिसनी तो तिनी काया दखी अनी ती त्यानी काया दखी
तर हाई वाईट परकार शे; त्या दोन्हीसले त्यासना भाऊबंदसनादेखत नाश करानं;
त्यानी आपली बहीणनी काया उघडी करी आशे व्हयी; त्यानी आपला दुष्कर्मना
भार वाहावाले पाहिजे.
18 जर एकादी बाईले मासिक पाळी व्हयी अनी तिनासंगे कोणी झोपना अनी
तिनी काया उघडी करी तर त्यानी तिना रंगतना झरा उघडं कर आशे व्हयी, त्या
दोन्हीसना भाऊबंदसनादेखत नाश करानं.
19 आपली मावशी नाहिते आत्या यासनी काया उघडी करानी नही जो तशे करी
त्यानी जोडेना नातेवाईकासकडे काया उघडी करेल शे आशे व्हयी, त्यानी आपला
दुष्कर्मना भार वाहावाले पाहिजे.
20 कोणी आपली काकूनीसंगे झोपना तर त्यानी आपला काकानी काया उघडी
करेल शे आशे व्हयी, त्या आपला पापना भार वाहीसनी बिना अपत्यसना मरतीन.
21 कोणी आपली भावजायले ठेई तर ती भ्रष्टता शे; तशे करीसनी आपला भाऊनी
काया उघडी करेल शे आशे व्हयी; त्या बिना पोऱ्यासोऱ्यासना राहातीन
22 हयानाकरता तुम्ही मना बठा विधी अनी मना बठा नियम मान्य करीसनी
पाळानं म्हणजे ज्या देशमा तुम्हले लयी जाई राहीनु शे तो तुम्हले वकनार नही.
23 ज्या देशले मी तुम्हनामोरेतीन घालाडनार शे त्यासना चालीरितीसना
अनुकरण करानं नही; त्यासनी आशे भ्रष्टाचार करं म्हणीन माले त्यासना तिटकारा
व्हनं
24 पण मी तुम्हले सांगेल शे की त्यासना देश तुम्हना वतन व्हयी, मी ते तुम्हले
सोपासुं जठे दुधमधना प्रवाह वाही राहीना शेतस आशा देश तुम्हना ताब्यामां दिसु;
तुम्हले इतर राष्ट्रासमाईन येगळा करणारा मी परमेश्वर तुम्हना देव शे.
25 याकरता तुम्ही शुध्द अनी अशुध्द चिडा यामासला भेद पाळानं अनी जो
कोणताबी जनावर,चिडा नाहिते जमिनवर रांगणारा जनावर मी तुम्हनाकरता अशुध्द
ठराईसनी निषेधेल शे. त्यानद्वारे तुम्ही स्वताले अमंगळ करानं नही.
26 तुम्ही मनाकरता पवित्र व्हवानं; कारण मी परमेश्वर पवित्र शे; तुम्ही मनावाला
राहावाले पाहिजे म्हणुन मी तुम्हले इतर देशमाईन येगळं करेल शे.
27 कोणी करनीकवटाळ वाला व्हयी, मंग तो माणुस राहो की बाई राहो त्यासले
नक्की मारी टाकानं, त्यासले दगडमार करानं; त्यासना रंगतपात त्यासना माथाले
राहि.

# 21

## याजकनी पवित्रता

1 परमेश्वर मोशेले बोलना, अहरोनना पोर्‍या ज्या याजक शेतस त्यासले आशे
सांग; त्यासना कुळमाईन कोणी मरं त्यासना कोणीच सुतक धरानं नही;
